https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

RNI No. - MAHMAR 2023/84526

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026



❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - २१७ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शनिवार दि.२७ सप्टेंबर २०२५ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## संघाची प्रार्थना म्हणजे सामूहिक संकल्प - सरसंघचालक मोहन भागवत

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७नागपूर**

काँग्रेस राजवटीत पंतप्रधानपदी इंदिरा गांधी असतांना लागलेल्या आणीबाणीवर (इमरजेंसी) सत्ताधारी भाजपकडून एकही टिका करण्याची संधी सोडली जात नाही. त्यातच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी आणीबाणीमध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्वयंसेवकाद्वारे कारागृहातील प्रार्थनेबाबत एक किस्सा सांगितला.

संघ प्रार्थना ध्वनिचित्रफीत लोकार्पण सोहळा शनिवारी नागपुरातील डॉ. हेडगेवार स्मृती भवन, रेशीमबाग येथे संपन्न झाला. त्यानिमित्त झालेल्या कार्यक्रमात मोहन भागवत पुढे म्हणाले, संघाची प्रार्थना हा संघाचा सामूहिक संकल्प आहे. स्वयंसेवक रोज त्याची आठवण करतात. व्यक्तिगत संकल्प स्वयंसेवकाच्या व्यक्तिगत प्रतिज्ञात तर



आम्ही सर्व मिळून काय करायचे ठरवले ते संघाच्या प्रार्थनेत आहे. प्रार्थनेमध्ये 'नमस्ते सदा वत्सले मातृभूमी आणि शेवट 'भारत माता की जय..' आहे. त्यात पहिला नमस्कार भारत मातेला आणि नंतर ईश्वराला नमस्कार आहे.

प्रार्थनेत भारत मातेला काहीही मागितले नाही. फक्त तिच्या करता जे द्यायचं त्याचा उच्चार आहे. जे मागायचे ते परमेश्वराला मागितले आहे. १९३९ पासून आज पर्यंत स्वयंसेवक रोज शाखेवर प्रार्थना म्हणतात. इतक्या वर्षाच्या या साधनेतून या प्रार्थनेला मंत्राचा सामर्थ्य लाभले आहे. प्रार्थनेमुळे स्वयंसेवक पक्का कसा होतो ते रोज प्रार्थना करणाऱ्या स्वयंसेवकाला माहित आहे. त्यामुळे ही प्रार्थना करण्याची धडपड स्वयंसेवकात दिसते. आणीबाणीमध्ये पुष्कळ लोकांचा पोलिसांनी पकडले. त्यात काही संघ शाखेतील नियमित तर काही अनियमितही होते. नियमित असलेल्यापैकी एक पॅरोलवर बाहेर आला होता. मी तिथे संघ प्रचारक असल्याने त्याला जाऊन भेटलो. त्यांना काळजीच काही कारण नव्हते. त्यांनी मला सांगितले हल्ली रोज शाखेत जायला मिळत नव्हते. परंतु कारागृहात रोज प्रार्थना करायला मिळते. ही प्रार्थना लोकांपर्यंत पोहचावी म्हणून आजचा उपक्रम असल्याचेही मोहन भागवत यांनी सांगितले.

**प्रार्थनेचा पहिला रूप भाव, त्यातून शब्द ठरुन अर्थ**

प्रार्थनेचा पहिला रूप हा भाव आहे. नंतर शब्द ठरले, त्यातून अर्थ निघाला आणि मग त्या अर्थातून पुन्हा भाव स्पष्ट झाला. सुरुवातीला मराठी आणि हिंदी प्रार्थना होत्या. पण अखिल भारतात चालणारी भाषा संस्कृत असल्याने प्रार्थनेची संस्कृत रचना करण्याचा विचार झाला. त्या वेळी चर्चा झाली की आपण मराठी- हिंदी प्रार्थना कोणत्या भावाने करतो. तो भाव शब्दबद्ध करण्याची आवश्यकता होती. यासाठी भिडे मास्तरांकडे निरोप गेला. भिडे मास्तर हे संघाचे स्वयंसेवक आणि संस्कृत पंडित होते. त्यांनी त्या भावाला शब्दबद्ध केले आणि त्यामुळे प्रार्थना संस्कृतमध्ये रचली गेल्याचेही भागवत म्हणाले. पश्चिम बंगालचे उदाहरन सांगत त्यांनी प्रार्थना ही मने जोडणारी असल्याचे सांगितले.

## ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांच्या वाहनावर नगर शहराजवळ हल्ला

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७अहिल्या नगर**

ओबीसी समाजाचे नेते लक्ष्मण हाके यांच्या वाहनावर आज, शनिवारी सकाळी नगर शहराजवळ हल्ला करण्यात आला. यामध्ये त्यांच्या ताफ्यातील दोन वाहनांचे नुकसान झाले आहे. सुदैवाने यामध्ये लक्ष्मण हाके यांना कोणतीही इजा झाली नसल्याचे समजले. या घटनेने नगर शहरात खळबळ उडाली. जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी यासंदर्भात तिघांना ताब्यात घेण्यात आल्याची माहिती दिली. दरम्यान मी ओबीसी समाजाची बाजू मांडतो, ओबीसी आरक्षणासाठी लढतो म्हणून माझ्यावर ठरवून हल्ले केले जात असल्याची प्रतिक्रिया हाके यांनी लोकसत्ताशी बोलताना दिली.

ओबीसी समाजाचे नेते लक्ष्मण हाके यांची आज पाथर्डी तालुक्यातील निंबादैत्य नांदूर येथे सभा आहे. या सभेसाठी ते पाथर्डीकडे जाण्यासाठी दौंड रस्त्याने



आज सकाळी येत होते. नगर शहराजवळ खंडाळा ते अरणगाव यादरम्यान त्यांच्या वाहनांचा ताफा काहीकाळ थांबला असता त्यावर काही तरुणांनी हा हल्ला केला. या घटनेनंतर लक्ष्मण हाके बाह्यवळण रस्त्याने पाथर्डीकडे रवाना झाले.

दरम्यान हाके यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी हा माझ्यावरील नववा हल्ला आहे. मी ओबीसी समाजाची बाजू मांडतो, ओबीसी आरक्षणासाठी लढतो म्हणून माझ्यावर हल्ले होत आहेत, असे सांगितले.ते म्हणाले, की आज सकाळी आठ ते दहा जणांनी काठ्या व बांबूने हल्ला केला. त्यामध्ये माझ्या वाहनाच्या पाठीमागील बाजूची काच फोडली तर दुसऱ्या वाहनाच्या चालकाच्या बाजूची काच फोडण्यात आली. दोघा कार्यकर्त्यांना मुका मार लागला आहे.

नगर तालुका पोलिसांशी संपर्क केला असता त्यांनी या घटनेला दुजोरा देत कारवाई सुरू असल्याची माहिती दिली.

## आधी कोणाची निवडणूक? नगरपालिका की जिल्हा परिषद - उत्सुकता शिगेला

### निवडणूक आयोगाच्या हालचालींवर सर्वांचे डोळे



**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७मुंबई**

जिल्हा परिषद निवडणूक ही आधी आणि नंतर नगरपालिका व शेवटी महापालिका निवडणूक घेतली जाईल, असे चित्र असताना महापूर, अतिवृष्टीमुळे ग्रामीण भागातील म्हणजे जिल्हा परिषद व पंचायत समित्यांची निवडणूक घेण्यात अडचण आली तर आधी नगरपालिकांची निवडणूक घेण्याची तयारी राज्य निवडणूक आयोगाने ठेवली आहे. त्यामुळे अपेक्षित क्रम बदलला जाणार का, याबाबत राजकीय वर्तुळात उत्सुकता आहे.

जिल्हा परिषद निवडणुकीच्या दृष्टीने मतदार याद्यांचा कार्यक्रम निवडणूक आयोगाने जाहीर केला आहे. या मतदार याद्यांवर नागरिकांच्या हरकती व सूचना मागविणे आणि त्यावर निर्णय देऊन २७ ऑक्टोबरला अंतिम मतदार याद्या जाहीर करण्यात येणार आहेत. त्यानंतर जिल्हा परिषद गट आणि पंचायत समित्यांच्या गणांचे आरक्षण जाहीर करून नोव्हेंबरच्या मध्यात प्रत्यक्ष निवडणूक कार्यक्रम जाहीर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे डिसेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात जिल्हा परिषद निवडणूक होईल, असे मानले जात होते.

मात्र, राज्यातील जवळपास २०हून अधिक जिल्ह्यांमध्ये अतिवृष्टी आणि महापुरामुळे गंभीर परिस्थिती आहे. प्रचंड नुकसान झाले आहे. विशेषत: मराठवाडा, विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्रात पिकांना मोठा फटका बसला असून, बळीराजा हवालदिल झाला आहे. डोक्यावर कर्जाचा डोंगर आहे. अशा परिस्थितीत निवडणूक आधी घेणे संयुक्तिक ठरेल का, याचा विचार आता सुरू झाला आहे. दरम्यान, खात्रीलायक सूत्रांनी सांगितले की, वेळ आलीच तर नगरपालिकांच्या निवडणुका आधी घेता यावी दृष्टीने निवडणूक आयोगाने तयारी ठेवली आहे.


**निवडणुकांची स्थिती नाही**

निवडणुकीच्या तारखा जाहीर करण्याचा अधिकार राज्य निवडणूक आयोगाला आहे. आयोग राजकीय पक्ष तसेच जिल्हाधिकाऱ्यांचे याबाबतचे मत व राज्यातील नेमकी परिस्थिती बघून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा क्रम निश्चित करेल असे मानले जात आहे. ३१ जानेवारी २०२६ पूर्वी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सर्व निवडणुका घ्याव्यात, असे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिलेले आहेत. अतिवृष्टी, महापुराचा फटका बसलेल्या ग्रामीण भागात जिल्हा परिषद, पंचायत समित्यांची निवडणूक आधी घेण्यासारखी स्थिती नाही असे प्रमुख राजकीय पक्षांच्या नेत्यांचे म्हणणे आहे. त्यात सत्तारूढ व विरोधी पक्षांचे नेतेदेखील आहेत.

## तुषार गांधींची संविधान सत्याग्रह यात्रा काँग्रेसकडून 'हायजॅक'

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७नागपूर**

महात्मा गांधींचे पणतू तुषार गांधी यांच्या नेतृत्वाखाली २९ सप्टेंबर ते २ ऑक्टोबरदरम्यान नागपूर येथील संविधान चौक ते सेवाग्राम दरम्यान होणाऱ्या 'संविधान सत्याग्रह' पदयात्रेवर काँग्रेसने वर्चस्व प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप सामाजिक संघटनांनी केला आहे. यामुळे ही यात्रा राजकीय वादाच्या भोवऱ्यात अडकण्याची चिन्हे दिसत आहेत.'हम भारत के लोग' या संस्थेच्या पुढाकारातून आणि विविध नागरी संघटनांच्या सहकार्याने ही यात्रा आयोजित करण्यात आली आहे. संविधानिक मूल्यांचे रक्षण, सामाजिक




सौहार्द आणि गांधीवादी विचारांचा प्रचार हा या यात्रेचा मुख्य हेतू आहे. देशभरातील अनेक सामाजिक संघटनांनी तसेच नागपूर आणि विदर्भातील विद्यार्थी, कार्यकर्ते आणि नागरिकांनी यात्रेला पाठिंबा दर्शवला आहे.

मात्र, काँग्रेस पक्षाने या यात्रेला मोठ्या प्रमाणावर प्रसिद्धी देत आपल्या पक्षाचे नेते, चिन्हे असलेले पोस्टर्स, बॅनर आणि सोशल मीडियावर प्रचार सुरू केला आहे. त्यामुळे ही यात्रा काँग्रेसचीच असल्याचा आभास निर्माण होत असल्याने नागरी संस्थांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. यात्रेच्या आयोजन बैठकीतही ही नाराजी व्यक्त झाली.राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विचारधारेचे अभ्यासक ज्ञानेश्वर रक्षक यांनी सांगितले, ही पदयात्रा नागरी समाजाच्या पुढाकाराने आहे. काँग्रेसचा पाठिंबा स्वागतार्ह असला, तरी त्यांनी यात्रेचे राजकीयरण करू नये.

दरम्यान, यात्रेवर कोणत्याही पक्षाचा प्रभाव पडू नये म्हणून आयोजकांनी ठरवले आहे की तुषार गांधी यांच्या सोबत नोंदणीकृत कार्यकर्ते टी-शर्ट, टोपी व तिरंगा घेऊन पुढे चालतील, तर राजकीय नेते व कार्यकर्त्यांनी मागे चालावे.आयोजन समितीचे समन्वयक संदेश सिंगलकर यांनी सांगितले, ही 'हम भारत के लोग' संस्थेची यात्रा आहे. तुषार गांधी व हर्षवर्धन सपकाळ यांच्या पुढाकाराने ही पदयात्रा होत आहे. काँग्रेसनेही ती यशस्वी करण्यासाठी समिती स्थापन केली आहे.सध्या ही पदयात्रा समाजातील अनेक स्तरांचा सहभाग मिळवत असून, तिचा मूळ उद्देश जपण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## नाशिकचे परीक्षित तळोकर संयुक्त राष्ट्र सभेच्या अधिवेशनात सहभागी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७नाशिक**

नाशिकच्या परीक्षित तळोकर या तरुणाने आंतरराष्ट्रीय स्तरावर नाशिकचे नाव उज्ज्वल केले आहे. 'डार्विन डायनॅमिक्स' या स्टार्टअपचा संस्थापक असलेल्या परीक्षित यांना दि. २५ सप्टेंबर रोजी आयोजित करण्यात आलेल्या संयुक्त राष्ट्र महासभेच्या उच्चस्तरीय अधिवेशनात सहभागी होण्याचा मान मिळाला. ही संधी नाशिकसह संपूर्ण महाराष्ट्रासाठी अभिमानाची ठरली आहे.

या अधिवेशनात परीक्षित तळोकर यांनी भारत सरकारच्या युवक व क्रीडा सचिव पल्लवी जैन यांच्यासोबत भारतीय तरुणांच्या संधी, आव्हाने आणि त्यांच्या भूमिकेवर आपले विचार मांडले. जागतिक व्यासपीठावर भारतीय युवकांचा आवाज बुलंद करणारा हा क्षण ऐतिहासिक ठरला आहे. अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला परीक्षित तळोकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली होती. फडणवीस यांनी त्यांचे अभिनंदन करून भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. परीक्षित तळोकर



यांची 'डार्विन डायनॅमिक्स' ही कंपनी नवे तंत्रज्ञान, शाश्वत विकास आणि सामाजिक परिवर्तन या संकल्पनांवर आधारित उपाययोजना विकसित करत आहे. त्यांची दृष्टी आणि कार्यपद्धती आजच्या तरुणांसाठी प्रेरणादायी मानली जात आहे. परीक्षित तळोकर यांचा हा प्रवास नाशिकच्या युवकांसाठी दिशादर्शक ठरत असून, 'मोठी स्वप्नं पाहा आणि ती पूर्ण करण्यासाठी अथक परिश्रम करा, यश नक्की मिळते' हा संदेश ते आपल्या कामगिरीतून देत आहेत.

## लातूर, बीड, जालना जिल्ह्याला रेड अलर्ट

### शाळांना सुट्या जाहीर : बीड शहर आणि परिसरात पाणी शिरले

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७बीड**

मराठवाड्यात दोन दिवसांच्या विश्रांतीनंतर पावसाने पुन्हा जोर धरला असून नांदेड, लातूर, बीड, हिंगोली आणि धाराशिव जिल्ह्यांसाठी हवामान विभागाने शनिवारी ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. या भागांमध्ये मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर धाराशिव आणि नांदेड जिल्ह्यांत शाळांना सुट्या जाहीर करण्यात आल्या आहेत.

राज्यात सुरु असलेल्या अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर रायगड जिल्हा आणि पुणे घाट परिसरासाठी उद्या (२८ सप्टेंबर) रेड अलर्ट तर पालघर, ठाणे, मुंबई शहर, मुंबई उपनगर, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, नाशिक आणि छत्रपती संभाजीनगर या जिल्ह्यांसह सातारा घाट व कोल्हापूर घाट परिसरात ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे, असे राज्य आपत्कालीन कार्य केंद्राकडून कळविण्यात आले आहे.

लातूर जिल्ह्यात सुरू असलेल्या मुसळधार पाऊस आणि पूर परिस्थितीत नागरिकांनी सतर्क रहावे, जिल्हा प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी केले आहे. नैसर्गिक आपत्तीच्या काळात शासन आणि प्रशासन नागरिकांच्या मदतीसाठी सज्ज असून नागरिकांना सर्वोतोपरी मदत उपलब्ध करून देण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

## मातोश्रीचे खिसे झटका; खासदार संजय राऊतांचा 'गांज्या' राऊत असा उल्लेख किमान २० हजार कोटी शेतकऱ्यांना द्या : भाजपचा ठाकरे गटावर पलटवार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७मुंबई**

जनाब संजय राऊत यांनी पुन्हा एकदा सकाळी वायफळ बडबड करून भाजप व पंतप्रधान नरेंद्र मोदींवर टीका केली. मात्र लोकांचा सवाल आहे, हे संजय आहेत की 'गांज्या' राऊत? कारण रोज सकाळी त्यांची वागणूक गांजाच्या नशेतल्या माणसासारखी असते. पंतप्रधान नरेंद्र मोदी सातत्याने लोकांच्या पाठीशी उभे राहत असताना राऊतांचा राजकारणापुरताच मर्यादित विरोध केवळ नशेतली बडबड ठरत असल्याचे भाजपचे माध्यम प्रमुख नवनाथ बन यांनी म्हटले आहे.

संजय राऊत यांनी पीएम केअर फंडावर प्रश्न उपस्थित केले. मात्र नवनाथ बन यांनी स्पष्ट केले की, राऊतांनी आधी आपल्या पक्षाची खंडणीखोरीचा हिशोब जनतेसमोर ठेवावा. महाविकास आघाडीच्या काळात रोज १०० कोटींची वसुली होत होती, असा आरोप भाजपने केला. त्यानुसार अडीच वर्षांत तब्बल साडेनऊ लाख कोटींची लूट झाली. तुम्ही मातोश्रीचे खिसे झटकले आहेत. त्यातून किमान २० हजार कोटी तरी मराठवाड्यातल्या शेतकऱ्यांना द्या, असा थेट हल्ला भाजपने केला आहे.



पत्रकार परिषदेत बन म्हणाले की, मराठवाड्यातील ओल्या दुष्काळाने आणि पूरस्थितीने जनतेला झळ पोहोचली असतानाच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. या भेटीत मराठवाड्यासाठी केंद्राकडून भरीव मदतीची मागणी करण्यात आली असून पंतप्रधानांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.

आतापर्यंत राज्य सरकारने पहिल्या टप्प्यात थेट अडीच हजार कोटींची मदत शेतकऱ्यांच्या खात्यात जमा केली आहे. चाऱ्याची टंचाई, निवाऱ्याचा प्रश्न, अन्न-पाण्याची सोय, या सर्व बाबींवर महायुती सरकार युद्धपातळीवर काम करत आहे. दिवाळीपूर्वीच सर्व नुकसानग्रस्तांना दुसऱ्या टप्प्यातील मदत पोहोचेल आणि कुठलाही निकष-फॉमलिटी न लावता शेतकऱ्यांना थेट दिलासा देण्याचा निर्णय घेतला आहे.


**शेण खाण्याची सवय राऊतांना; जनतेचे आशीर्वाद मात्र देवा भाऊंना**

नवनाथ बन यांनी संजय राऊतांवर जोरदार टीका करताना म्हटलं की विधानसभेत जनतेने तुम्हाला नाकारलं, आणि देवा भाऊंना आशीर्वाद दिला. जनतेने तुम्हाला शेण खायला लावलं आहे. आजही तुमच्या थोबाडावर जनतेने शेण मारलंय. देवा भाऊंच्या मागे जनता आहे, तुमच्या मागे कोणी नाही, असा उपरोधिक हल्ला करण्यात आला.

## उद्धव ठाकरे यांचा सरकारवर निशाणा मदत तुटपुंजी आणि थट्टा करणारी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७मुंबई**

राज्यामधील नुकसानग्रस्तांना सरकारने जाहीर केलेल्या मदतीवरून उद्धव ठाकरे यांनी सरकारवर निशाणा साधला आहे. उद्धव ठाकरे यांनी म्हटले आहे की, सरकारची मदत ही तुटपुंजी आणि थट्टा करणारी आहे. सरकारने जाहीर केलेली मदत ही पुरेशी नाही आणि ती नुकसानग्रस्तांची चेष्टा करण्यासारखी आहे, असे त्यांचे म्हणणे आहे.विविध नैसर्गिक आपत्तींमुळे बाधित झालेल्या नागरिकांना आणि शेतकऱ्यांना सरकारने दिलेली मदत अत्यंत कमी असल्याचा आरोप त्यांनी केला. यामुळे अनेक नुकसानग्रस्त अजूनही मदतीपासून वंचित आहेत. सरकारने तातडीने यावर लक्ष देऊन नुकसानग्रस्तांना योग्य आणि पुरेशी आर्थिक मदत द्यावी अशी मागणी करण्यात आली आहे. सध्याच्या परिस्थितीत जाहीर केलेली मदत अपुरी असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. या प्रकारामुळे सरकारच्या मदत वाटप प्रणालीच्या कार्यक्षमतेवर आणि पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.



## संपादकीय ......

# संरक्षणसिद्धतेत भारताचे प्राईम यश

भारतीय संरक्षण व्यवस्थेच्या दृष्टिकोनातून दोन महत्त्वपूर्ण घडामोडी परवा एकाच दिवशी घडल्या. भारतीय संरक्षण संशोधन आणि विकास संस्था अर्थात डीआरडीओ व सामरिक बल कमांडने तब्बल २ हजार किलोमीटर दूरपर्यंतची मारक क्षमता असलेल्या अग्नी प्राईम या क्षेपणास्त्राची चक्क रेल्वेगाडीतून चाचणी घेतली. तर दुसरीकडे, भारतीय संरक्षण मंत्रालयाने हिंदुस्थान ॲरोनॉटिक्ससोबत ९७ स्वदेशी तेजस मार्क १ ए लढाऊ विमानांच्या खरेदीसाठी तब्बल ६२ हजार कोटी रुपयांचा करार केला आहे. या दोन्ही घडामोडींना अनोखा सुवर्णकांचन योग म्हणता येईल. पहिली घडामोड म्हणजेच पूर्णत: कार्यरत असलेल्या रेल्वे आधारित मोबाईल लाँचर सिस्टममधून मध्यम श्रेणीच्या (इंटरमीडिएट रेंज) अग्नी-प्राईम क्षेपणास्त्राचे प्रक्षेपण करण्यात आले. भारताने आतापर्यंत जमीन, लढाऊ जहाज आणि लढाऊ विमानांतून विविध श्रेणींच्या अग्नी क्षेपणास्त्रांचे प्रक्षेपण केलेले आहे. परंतु पहिल्यांदाच रेल्वेगाडीतून अशा प्रकारची चाचणी घेण्यात आली आहे. ही चाचणी अतिशय गुंतागुंतीची मानली जाते. त्यामुळे या चाचणीमुळे भारत रेल्वे नेटवर्कमधून कॅनिस्टराइज्ड लाँच सिस्टम विकसित करणार्या मोजक्या देशांच्या पंक्तीत जाऊन बसला आहे. अग्नी प्राईम हे एक अण्वस्त्रवाहक क्षेपणास्त्र आहे. भूमिगत तळावरून, रस्त्यावरून, विमानातून, पाणबुडीपाठोपाठ आता रेल्वेतूनही हे क्षेपणास्त्र डागता येईल. अशा प्रकारे रेल्वेतून क्षेपणास्त्र डागण्याची क्षमता विकसित करणे हे एकप्रकारे भारताच्या क्षेपणास्त्र सिद्धतेतही मोलाची भर घालणारे आहे. या क्षेपणास्त्राची २ हजार किमीची मारक क्षमता पाहता पाकिस्तानच काय तर चीनही भारताच्या सहज टप्प्यात असेल.

कोणत्याही देशाची खरी ताकद त्या देशावर शत्रूपक्षाकडून हल्ला झाल्यावरच दिसून येते. या काळात बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे आणि हवाई संरक्षण प्रणाली महत्त्वाची भूमिका बजावतात. पाकिस्तानविरुद्धच्या अलीकडच्या ऑपरेशन सिंदूरमध्ये भारताने हे सक्षमपणे सिद्ध करून दाखवले आहे. भारताने नियंत्रण रेषा अथवा आंतरराष्ट्रीय सीमा न ओलांडताच पाकिस्तानातील दहशतवादी प्रशिक्षण तळांवर अत्यंत अचूक आणि विध्वंसक हल्ले करून हे तळ उद्ध्वस्त केले. चिनी, तुर्कीयेचे ड्रोन हवेतल्या हवेत टिपून भारतावर आक्रमण करण्याचे नापाक इरादेही उधळून लावले. हे सर्व शक्य झाले ते भारताकडे असलेल्या तांत्रिकदृष्ट्या प्रगत, स्वदेशी बनावटीच्या आणि उच्च मारक क्षमता असलेल्या शस्त्रास्त्रांमुळेच. ज्यामध्ये अत्यंत सामर्थ्यशाली ब्रम्होस क्रूझ क्षेपणास्त्राचा वरचा क्रमांक आहे. त्याच जोडीला भारत-पाक संघर्षाच्यावेळी भारतीय आकाशाला सुरक्षेचे अभेद्य कवच घालण्याचे काम आकाश मिसाईलने करून दाखवले. भारतीय क्षेपणास्त्रांच्या ताकदीचा आणि अचूकतेचा जलवा सार्या जगाने बघितला होता. तेव्हापासून आकाश एअर डिफेन्स क्षेपणास्त्र प्रणाली आणि ब्रह्मोस सुपरसॉनिक क्रूझ क्षेपणास्त्राची जगभरात चर्चा सुरू आहे. याच रांगेत अग्नी क्षेपणास्त्र हे अत्यंत दूरवरचा पल्ला गाठणारे भारताचे अत्यंत घातक शस्त्र मानले जाते. रडारमध्ये न येताच शत्रूच्या छातीवर प्रहार करण्याची ब्रम्होसची क्षमता आहे. हवा, पाणी किंवा जमिनीवरून ताशी अडीच हजार ते तीन हजारच्या वेगाने म्हणजे डोळ्याची पापणी लवण्याआधी हे क्षेपणास्त्र ६०० किमी अंतरापर्यंतचे सावज सहज टिपते. तर, अग्नीची मारक क्षमता थेट ९०० किमी ते ५ हजार किमी इतकी प्रचंड आहे.

भारताने आतापर्यंत अग्नी क्षेपणास्त्राच्या एकूण ६ मालिका विकसित केल्या आहेत. प्रत्येक मालिकेत आधुनिक तंत्रज्ञान आणि प्राणघातक क्षमता वाढत जाते. सध्या अग्नी ५ ची चाचणी घेण्यात आली असून भारत अग्नी ६ वर देखील काम करत आहे, ज्याची रेंज ८ हजार ते १२ हजार किमी असू शकते. याचा अर्थ भारत अमेरिका आणि युरोपीय देशांपर्यंत मारा करण्यास सक्षम असेल. एका बाजूला भारतीय क्षेपणास्त्रांचा दबदबा निर्माण होत असताना भारतीय हवाई दलातील लढाऊ विमानांची पोकळीही स्वदेशी तेजसच्या माध्यमातून भरून काढली जात आहे. संरक्षण मंत्रालयाने करार केलेली विमाने ही एलसीए तेजसचे ॲडव्हान्स व्हर्जन अर्थात मार्क १ ए अशी असतील. या विमानांमध्ये अत्याधुनिक एव्हिऑनिक्स, रडार आणि ऑपरेटिंग सिस्टम असणार आहेत. याआधी २०२१ साली संरक्षण दलाने ८३ मार्क १ ए खरेदीचा करार करण्यात आला होता. यातील विमाने एक एक करून भारतीय हवाई दलात आता सहभागी होऊ लागली आहे. तर नव्याने करार करण्यात आलेली विमाने २०२७-२८ च्या दरम्यान हवाई दलात सामील होतील असा अंदाज आहे. हवाई दल मागच्या काही वर्षांपासून घटत्या स्कॉड्रन क्षमतेशी झुंज देत आहे. जॅग्वॉर, मिराज २००० आणि मिग २१ लढाऊ विमानांच्या निवृत्तीनंतर भारतीय हवाई दलाची क्षमता प्रचंड घसरणार आहे. एलसीए तेजस या विमानांची जागा भरून काढतील. परंतु मध्यंतरी या विमानांच्या विलंबावरून एअर चीफ मार्शल अमर प्रीत सिंग यांनी एचएएलवर कठोर शब्दांत टीका केली होती. ऑपरेशन सिंदूरमुळे आपल्या उणिवांचीही चांगलीच जाणीव आपल्याला झाली हे एका अर्थाने बरेच झाले. त्यामुळे कधी नव्हे ते संरक्षण मंत्रालयाने भारताच्या तिन्ही सशस्त्र दलांना मजबूत करण्याचे धोरण हाती घेतले आहे. निर्णयप्रक्रियेला गती मिळून निधीही मंजूर केला जात आहे. ऑपरेशन सिंदूरनंतर ब्रम्होसच्या खरेदीत जगातील १७ देशांनी रस दाखवला आहे. तर स्वदेशी तेजसनेही अमेरिका, रशिया, फ्रान्स व इतर महासत्तांना तोंडात बोटे घालायला लावली आहेत. जगभरात भारतीय शस्त्रांची मागणी वाढल्यास भारताची संरक्षण क्षेत्रातील स्वदेशी क्षमताही अधिक भक्कम होत जाईल. त्यामुळे संरक्षणसिद्धतेत भारताचे हे प्राईम यश म्हणावे लागेल.

## विशेष संपादकीय:

# सुधा मूर्ती – प्रेरणास्थान



नवरात्र उत्सवाच्या पावन दिवसात एका दुर्गा स्वरूप स्त्रीशी प्रत्यक्ष भेट होणे म्हणजे खऱ्या अर्थाने भाग्यच लागते. माझ्या आयुष्यातील आदर्श, भारतीय साहित्यातच नव्हे तर सम्पूर्ण साहित्य विश्वात नाव असेलेल्या, एक शिक्षिका, समाजसुधारक आणि प्रत्येक भारतीय स्त्री चे प्रेरणास्थान असलेल्या डॉ. सुधा मूर्ती मॅडम यांची आभासी पद्धतीने भेट होणे हे माझ्यासाठी अतिशय मौलिक क्षणांपैकी एक ठरले.लहानपणापासूनच मी त्यांना माझ्या जीवनातील आदर्श मानले, त्यांच्या निवडक कादंबऱ्या घेऊन माझा पीएच.डी. संशोधनप्रबंध केला. अश्या मॅडमला एकदा तरी भेटता यावं खूप इच्छा होती. त्यासाठी मी त्यांना कॉल केला असता, त्यांनी मला सांगितले कि, मी आता अमेरिकेला आहे, आल्यावर कळवते . मला असे वाटले कि मॅडम आपल्याला कश्याला कळवतील. पण तो माझा गैरसमज ठरला. मॅडम एक महिन्याने परत आल्या तर न विसरता त्यांनी मला मेल केला कि, मी २६ तारखेला सकाळी १०.३० ला आहे तुम्ही मला झूम मीटिंग ची लिंक पाठवा. मला दोन मिनिटे विश्वासच बसेना कि, एका साधारण स्त्री ला लक्षात ठेवून मेल करणे व स्वतःहून मिटिंग साठी सांगणे. खरंच माझ्यासाठी खूप मोठी उपलब्धी आहे. मी लगेच देव्हाऱ्याजवळ गेली व कान्हाचे आभार मानले.मिटिंग सुरु होण्याआगोदर मनात असलेली भीती ताण त्याच्या साधेपणा, प्रगल्भता, दयाळूपणा, समाजासाठी असलेली कणव याचे दर्शन त्याच्या चेहऱ्यातून होताच मी शांत झाले. आणि माझ्याशी जणू माझे खूप हक्काचे, जवळचे कुणी संवाद करत आहेत असे वाटले . आज मी प्रत्यक्ष त्यांच्या समोर बसून त्यांच्या विचारांना, अनुभवांना आणि मार्गदर्शनाला ऐकत होती.हा अनुभव अविस्मरणीय ठरला. त्यांच्या आशीर्वादातून मला पुढील वाटचालीसाठी नवी ऊर्जा मिळाली, नवी दिशा मिळाली.सुधा मूर्ती मॅडम ह्या केवळ लेखिका नाहीत; त्या समाज बदलासाठी झटणाऱ्या, स्त्रियांचे सशक्तीकरण करणाऱ्या आणि प्रत्येकाला आत्मविश्वास देणाऱ्या व्यक्ती आहेत. त्यांच्या लेखनातून जीवनातील साधेपणा, नैतिकता, मानवी मूल्ये आणि स्त्रियांच्या सामर्थ्याची गहन समज आपल्या उलगडते . खरा बदल मोठ्या घोषणांमध्ये नाही, तर रोजच्या कृतीत, मदतीत आणि शिक्षणाद्वारे होत असतो हे प्रत्येकाने लक्षात घ्यायला हवे.त्यांचे व्यक्तिमत्व विद्यार्थ्यांसाठी, महिलांसाठी आणि समाजासाठी एक प्रेरक आदर्श आहे. साधेपणा, प्रगल्भता आणि दयाळूपणा यांचा अद्भुत संगम त्यांनी आपल्या जीवनात साधला आहे. त्यांच्या भेटीतून मिळालेली मार्गदर्शन फक्त शैक्षणिक प्रगतीसाठी नाही, तर जीवनाची मूल्य समजून घेण्यात आणि व्यक्तिमत्व घडविण्यासाठी देखील महत्वाचे ठरते.सुधा मूर्ती मॅडम यांच्यासोबत संवाद साधता असताना हे लक्षात आले की, महत्त्वाची गोष्ट फक्त यश मिळवणे नाही; तर आपल्या ज्ञानाचा, वेळेचा आणि संसाधनांचा उपयोग समाजाच्या भल्यासाठी करणे ही खरी महानता आहे. त्यांच्या याच अष्टपैलू व्यक्तिमत्वामुळे त्या प्रत्येकाच्या हृदयात कायम स्मरणीय होतात.आजचा दिवस, त्यांच्या भेटीतून मिळालेली प्रेरणा आणि आशीर्वाद, माझ्या आयुष्यातील एक अमूल्य अनुभव ठरला आहे. या भेटीने माझ्या मनात ठाम विश्वास निर्माण केला की, योग्य मार्गदर्शन, साधेपणा आणि चिकाटीने आपण कोणत्याही अडथळ्यांना पार करू शकतो.सुधा मूर्ती मॅडमसारखी व्यक्ती आपल्या जीवनात आल्यावर, प्रत्येक क्षण नव्या आशा, नव्या विचारांची आणि नव्या प्रेरणेची उर्जा घेऊन येतो. त्यांच्या प्रकाशाने जीवन उजळते, मन समृद्ध होते आणि आत्मविश्वास वाढतो. सुधा मूर्ती मॅडम तुमचे खूप खूप आभार.




# फिट अँड फाईन राहण्यासाठी आहारात समाविष्ट करा 'या' भाज्या

**दि.२७विदर्भ प्रजासत्ताक**

फिट अँड फाईन राहण्यासाठी संतुलित आहार घेणे आवश्यक आहे. बरेच जण रोजच्या आहारात भाज्या खात नाहीत. मात्र तज्ञांच्या मते, काही भाज्यांचा आहारात समावेश करणे आरोग्यासाठी फायदेशीर असते. या भाज्यांमुळे रक्तातील साखर नियंत्रणात राहते, रोगप्रतिकारकशक्ती वाढते आणि पचनक्रिया सुधारते. या भाज्या कोणत्या ते जाणून घेऊया.



**ब्रोकोली**- ब्रोकोली शरीरातील जळजळ कमी करण्यास मदत करते. यामध्ये सल्फोराफेन असते ज्यामुळे शरीरातील विषारी पदार्थ बाहेर पडतात.

**बीटरुट**- बीटरुटमध्ये नायट्रेट्स असतात जे रक्तप्रवाह सुधारतात आणि त्यातील बीटेन हा घटक पचनक्रिया सुधारण्यास फायदेशीर ठरते.

**रताळे**- उपवासाला आपण रताळे खातो. पण रताळे हे आरोग्यासाठी खूप फायदेशीर असते. त्यामुळे ते उपवासाव्यतिरिक्त पण खाणे चांगले असते. रताळ्यामध्ये फायबर आणि अँटीऑक्सिडंट्स असतात, ज्यामुळे पचनक्रिया सुधारते.

**पालक आणि हिरव्या पालेभाज्या**

पालक आणि इतर हिरव्या भाज्यांमध्ये मॅग्नेशियम, फोलेट आणि प्रीबायोटिक फायबर भरपूर प्रमाणात असते, जे निरोगी आतड्यांसाठी फायदेशीर असते.

**गाजर**- गाजर हे बहुतांश वेळा सॅलड म्हणून खाल्ले जाते. यामध्ये कॅरोटीनॉइड्स असतात, जे त्वचा आणि डोळ्यांसाठी फायदेशीर असतात.

**कारले**- कारल्यामुळे रक्तातील साखरेची पातळी नियंत्रणात राहण्यास मदत होते. त्यात पोषक घटक असतात चयापचय सुधारते.

**फुलकोबी** – फुलकोबी मेंदू आणि यकृताच्या आरोग्यासाठी आवश्यक आहे. ही कमी कॅलरीज असलेली भाजी आहे.

# शालेय शिक्षणात कृषी विषयाचा समावेश

## राज्यमंत्री पंकज भोयर यांची माहिती

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२७ मुंबई**- राष्ट्रीय शिक्षण धोरण आणि राज्य अभ्यासक्रम आराखडा शालेय शिक्षण २०२४ यांच्यामध्ये 'व्यवसाय शिक्षणाच्या नवकल्पने' चा समावेश आहे. त्या अंतर्गत चालू शैक्षणिक वर्षी इयत्ता पहिलीच्या अभ्यासक्रमामध्ये कार्य शिक्षण या विषयांतर्गत कृषी शिक्षणाचा समावेश करण्यात आलेला आहे. पुढील शैक्षणिक वर्षापासून टप्प्याटप्प्याने इयत्ता दहावीपर्यंतच्या अभ्यासक्रमामध्ये कृषी विषयाचा समावेश करण्यात येणार असल्याची माहिती शालेय शिक्षण मंत्री पंकज भोयर यांनी शुक्रवारी (२६ सप्टेंबर) दिली. शालेय अभ्यासक्रमात कृषी अभ्यासक्रमाचा समावेश करण्याबाबत आज मंत्रालयात बैठक झाली. या बैठकीत बोलताना भोयर म्हणाले, शालेय शिक्षण अभ्यासक्रम २०२५ चे कामकाज अंतिम टप्प्यात आहे. या नवीन अभ्यासक्रमामध्ये वय वर्षे ३ ते ८ मधील विद्यार्थ्यांना कार्य शिक्षण या विषयांतर्गत २१ व्या शतकातील महत्वपूर्ण कौशल्ये, तसेच कृषी, पर्यटन व्यावसायिकतेचा पाया सुरुवातीपासून घातला जाईल, अशा उपक्रमांची मांडणी करावी. विद्यार्थ्यांमध्ये भारतीय संस्कृती रुजवण्यासाठी स्थानिक सण, समारंभ, परंपरा, कला, पिके, भौगोलिक रचना, उपलब्ध साधन सामग्री यांचाही विचार कार्य शिक्षण विषयाच्या



उपक्रमाची मांडणी करताना करावा. भारतातील शेतीचे महत्व, कृषि क्षेत्रातील गुंतवणूक, शेतीचे लोकजीवनातील विशेष स्थान या सर्व बाबींचा विचार करता नव्या पिढीची नाळ कृषी क्षेत्राशी जोडण्यासह कृषी क्षेत्रात तंत्रज्ञानाचा विस्तार होण्यासाठी माती, पाणी, नैसर्गिक संसाधने, वनस्पती, स्थानिक पशुपक्षी या विषयातील नवीन उपक्रम अभ्यासक्रमात सुचविण्यात यावेत, अशी सूचना पंकज भोयर यांनी केली.

इयत्ता ६ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांना परसबाग, सेंद्रिय शेती, तृणधान्य उत्पादन, अन्न प्रक्रिया, कृत्रिम बुद्धिमत्ता , बांबूचा वापर, पाळीव प्राण्यांचे पोषण, कुकुट पालन, पर्यटन आणि आदरातिथ्य, जल व्यवस्थापनासाठी पाण्याचे लेखापरीक्षण, जैवविविधता नोंदणी, इंधनविरहीत स्वयंपाक इत्यादी विषय उपलब्ध करून देण्यात यावेत. शेतीसारख्या परंपरागत विषयात नवीन तंत्रज्ञानाची ओळख विद्यार्थ्यांना करून देत कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित साधनांचा उपयोग कसा करावा याचा अभ्यासक्रमात सहभाग असावा, असेही भोयर यांनी सांगितले.

# ५४ खातेधारकांची ३३.६१ लाखाने फसवणूक

## सहयोग मल्टीस्टेट सोसायटीमधीलखळबळजनक प्रकार

## राजापेठ पोलिस स्टेशनला गुन्हा दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२७अमरावती**:राजापेठ पोलिस स्टेशनच्या हद्दीत असलेल्या सहयोग मल्टीस्टेट को ऑप क्रेडीट सोसायटी बेनीफेट शाखा तारामंदीर रोड येथे ३३ लाख ६१ हजार १९५ रुपयांनी ५४ खातेधारकांची फसवणूक करण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला आहे.

### गुंतवणूक केल्यावर परतावा दिला नाही

या शाखेत टीम लीडर म्हणून कामकरणाऱ्या रियाज अहमद शेखबन्नू (४२, सुफियाननगर) यांनी याविषयी राजापेठ पोलिसांकडे तक्रार दिली आहे. त्यानुसार आरोपी शिवाजी किसनराव जाधव (पुणे), प्रमोद भुजंगराव डकडे (वृंदावन कॉलनी, अमरावती) यांनी खातेधारकांची रक्कम घेऊन त्यांना परतावा दिला नाही.

टीम लिडर असल्यामुळे ५४ खातेधारकांनी त्यांच्या माध्यमातून सुमारे ३३ लाख६१ हजार १९५ रुपयांची गुंतवणूक केली. २०१६ पासून ३० सप्टेंबर २०२० या कालावधीत ही रक्कम गुंतवण्यात आली.

राजापेठ पोलिसांनी दोन्ही आरोपींविरुध्द गुन्हा दाखल केला आहे.

# धारणी जवळ पुलावर दुचाकीचा भीषण अपघात, एक गंभीर, एकाची प्रकृती चिंताजनक

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२७अमरावती** – धारणी-हरीसाल मार्गावर लवादा ते चित्री गावाजवळ एका दुचाकीचा अपघात झाला. दुचाकीस्वाराचे नियंत्रण सुटल्याने दुचाकी थेट पुलावरील सुरक्षा कठड्यांना धडकली. या भीषण अपघातात एक युवक गंभीर जखमी झाला असून दुसऱ्या युवकाची प्रकृती चिंताजनक आहे.अपघातानंतर तातडीने दोघांनाही उपचारासाठी अमरावती येथील रुग्णालयात हलवण्यात आले आहे. प्राथमिक माहितीनुसार, हे दोघे युवक अमरावतीहून धारणी येथे नातेवाईकांकडे जात होते, त्यावेळी हा अपघात घडला.स्थानिक प्रशासन आणि पोलीस यंत्रणा घटनास्थळी दाखल झाली असून अधिक तपास सुरू आहे.




# 'या' नांगराच्या वापरामुळे जमिनीमध्ये पाणी धरून राहते, जास्त पाण्याचा निचरा होतो!

**दि.२७विदर्भ प्रजासत्ताक** – शेतकरी बांधवासाठी नवीन असे हे अवजार आहे. ज्याला आपण पटाशी नांगर(असे म्हणतो तर इंगजीमध्ये याला आपण सब सॉईलर प्लो म्हणतो. हा एक प्रकारचा नांगर आहे. या अवजाराचा उपयोग बहुतांश शेतकरी बांधव करताना दिसत नाहीत. आपणास माहित आहे की, तयार झालेल्या शेतमालाला शेतातून घरी आणेपर्यंत कितीतरी वेळा शेतामध्ये ट्रॅक्टरची (ढीरलींी ऋीी-ळपस) ने-आण करावी लागते. ट्रॅक्टर सोबत विविध अवजारे शेतीमध्ये चालविली जातात. ट्रॅक्टर आणि अवजारे इत्यादीच्या सततच्या वापरामुळे जमिनीचा खालचा थर कठीण झालेला दिसतो. यालाच आपण हार्डपॅन असे म्हणतो.

हार्डपॅन तयार होण्यामागे रोटावेटर चालविण्याचा प्रामुख्याने समावेश होतो. जमिनीचे खालचे थर कडक राहिलेले दिसून येतात. आणि याचा परिणाम असा होतो कि पावसाचे पडणारे पाणी या




हार्डपॅनमुळे जमिनीत मुरत नाही आणि खोलवर जात नाही आणि त्यामुळे जर सब सॉईलर प्लोव्दारे जमिनीची नांगरणी केल्यास जवळपास दोन ते अडीच फूट पर्यंतचा कडक थर तोडला जातो.

जास्त पाऊस झाल्यास पाणी जमिनीमध्ये खोलवर जाण्यास मदत होते आणि जमिनीची पाणी भरण क्षमता वाढते. पाऊस कमी झाल्यास जमिनीमध्ये ओलावा टिकून रहातो आणि त्यामुळे पाण्याअभावी पिके लवकर सुकत नाहीत. रब्बी हंगामामध्ये घेत असलेल्या पिकांना या जमिनीतील ओलाव्याचा फायदा होतो.

ज्या शेतामध्ये पावसाचे पाणी साचते आणि ज्या शेतामध्ये मातीतील ओलावा लवकर कमी होत जातो अशा दोन्ही प्रकारच्या जमिनीसाठी सब सॉईलर प्लो अत्यंत उपयोगी आहे. सबसॉईलर प्लोच्या वापरामुळे जमिनीमध्ये पाणी धरून राहते. पाऊस जास्त झालेल्या जमिनीमध्ये पाण्याचा निचरा योग्य प्रकारे होतो.

– डॉ. अनिलकुमार कांबळे

**संशोधन अभियंता**

**डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला.**

शेतकरी ते थेट ग्राहक
**कामधेनु नॅचरल्स**
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / PDF / वेब – पोर्टल /ई – पेपर

Scan this QR code using the WhatsApp camera to join this group
क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

# विदर्भ प्रजासत्ताक

शनिवार दि. २७ सप्टेंबर २०२५

शहर/ग्रामिण

# शहर विकासाची कामे तातडीने आणि वेळेत पूर्ण करा

## पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी घेतला महापालिकेचा आढावा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती**

अमरावती शहराच्या सर्वांगीण विकासासाठी शासनाची बांधिलकी आहे. येथील विकासकामांना गती देवून रस्ते, पाणीपुरवठा, ड्रेनेज व इतर मूलभूत सुविधा प्राधान्याने पूर्ण करा. स्वच्छता मोहिम बळकट करा. संबंधित कामे वेळेत, गतीने व पारदर्शकतेने पूर्ण करण्याचे निर्देश पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले.

पालकमंत्री श्री. बावनकुळे यांनी आज महापालिकेचा आढावा घेतला, त्यावेळी ते बोलत होते. खासदार डॉ.अनिल बोंडे, आमदार संजय खोडके, आमदार सुलभा खोडके, आमदार रवि राणा, आमदार राजेश वानखडे, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, महापालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक तसेच संबंधित अधिकारी यावेळी उपस्थित होते.

स्वच्छ भारत अभियानांतर्गत नियमित स्वच्छता, कचरा संकलन व विलगीकरण काटेकोरपणे व्हावे. शहरात पायाभूत सुविधा, रस्ते दुरुस्ती, स्वच्छता मोहिम, कचरा व्यवस्थापन, पाणीपुरवठा, ड्रेनेज व्यवस्था, अतिक्रमण निर्मूलन या नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित महत्त्वाच्या सुविधा आहेत. ही कामे वेळेत आणि पारदर्शक पद्धतीने व्हावीत. पाणीटंचाईवर उपाययोजना तसेच जलस्रोत व्यवस्थापन, पाइपलाइन दुरुस्ती व टंचाईग्रस्त भागात तातडीने उपाय राबवा. नागरिक तक्रार निवारण तसेच डिजिटल तक्रार प्रणाली प्रभावीपणे राबवा व तक्रारींना त्वरित प्रतिसाद द्या, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

अमरावती हे आपले शहर आहे. स्वच्छता, पाणीबचत, हरित उपक्रम, अतिक्रमणमुक्ती आणि कायदा सुव्यवस्थेत नागरिकांचा सक्रीय सहभाग मिळाला, तर विकासकामांना गती मिळेल,असे ते यावेळी म्हणाले. शहरातील नागरिकांना अधिक सुलभ सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने अमरावती महानगरपालिकेतर्फे नवनवीन उपक्रम हाती घेण्यात आले आहेत. या उपक्रमांचे उद्घाटन पालकमंत्री श्री. बावनकुळे यांच्या हस्ते यावेळी करण्यात आले. ई-गव्हर्नन्स उपक्रम -केंद्रीकृत नागरिक डॅशबोर्ड, ब्लॉकचेनचा वापर, कामगार प्रमाणपत्रांसाठी वेब पोर्टल याचे उद्घाटन करण्यात आले. तसेच 'महापालिका संदेशिनी ' न्यूज पोर्टल यासह अमरावती शहर कूल रूफ नियमावली -२०२५ चे उद्घाटन करण्यात आले. तसेच शहरी आरोग्य वेलनेस केंद्राचे ऑनलाइन लोकार्पण यावेळी करण्यात आले. महानगरपालिकेच्या या विविध उपक्रमांमुळे शहराच्या विकासाला चालना मिळून नागरिकांना सोयीसुविधा अधिक प्रभावीपणे उपलब्ध होणार आहेत. हे उपक्रम आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून नागरिकांना जलद, पारदर्शक आणि विश्वासार्ह माहिती उपलब्ध होणार आहे. माहिती तंत्रज्ञान, ब्लॉकचेन, केंद्रीकृत नागरिक डॅशबोर्ड यांसारख्या उपक्रमांमुळे नागरिकांना घरबसल्या आवश्यक सुविधा उपलब्ध होणार आहेत. 'कूल रूफ नियमावली २०२५' हा उपक्रम शहराच्या पर्यावरणपूरक आणि शाश्वत विकासाच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल आहे. या नियमावलीमुळे उष्णतेची तीव्रता कमी होईल तसेच आरोग्यदायी वातावरणाची निर्मिती होईल. शहरी आरोग्य वेलनेस केंद्रांचे नूतनीकरण नागरिकांच्या आरोग्य सुरक्षेसाठी अत्यंत आवश्यक असून, यामुळे आरोग्यसेवा अधिक सक्षम आणि वेळेवर उपलब्ध होणार आहे.बैठकीत आमदार संजय खोडके व आमदार सुलभा खोडके यांनी प्रत्यक्ष भाड्यावर कर आकारणी ५६ टक्के असून ती जास्त असून कमी करण्यासाठी यावेळी मागणी केली. यावर पालकमंत्री श्री. बावनकुळे यांनी त्वरीत कर आकारणी कमी करण्याच्या सूचना महानगरपालिका आयुक्त श्रीमती शर्मा यांना दिल्या.

यावेळी अंबा नाला गाळ काढणे, अंबादेवी व एकवीरा देवी मंदिराला ब-श्रेणी तीर्थक्षेत्राचा दर्जा मिळवणे, घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प, स्मार्ट स्ट्रीट लाईट प्रणाली, पीएम ई -बस सेवा, छत्री तलाव परिसर सौंदर्यीकरण, जवाहर गेट जतन, मनपाची नवीन प्रशासकीय इमारत, शाळा व मॉडेल यूपीएससी उभारणी, दिव्यांग भवन, शिवसृष्टी प्रकल्प, रमाई आवास योजना, भुयारी गटार योजना, चौक सौंदर्यीकरण, महात्मा फुले संकुल, नेहरू मैदान टाऊन हॉल इमारत या विषयांवर चर्चा झाली. या विकास कामांसाठी शासनाकडून आवश्यक मंजुरी त्वरीत देण्यात येईल.या संदर्भात संबंधित अधिकाऱ्यांनी दिलेल्या निर्देशाचे पालन करण्याचे आदेश पालकमंत्री श्री. बावनकुळे यांनी दिले.



विविध उपक्रमांचे पालकमंत्री यांच्या हस्ते उद्घाटन

# खांबावरून पडून तरुण विज कर्मचाऱ्याचा मृत्यू

## नांदगाव पेठ एमआयडीसी मधील घटना, कर्मचारी व गावकऱ्यांमध्ये हळहळ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७नांदगाव पेठ-** नांदगाव पेठ एमआयडीसी परिसरात वीजपुरवठा खंडित झाल्यानंतर तो सुरळीत करण्यासाठी महावितरणच्या बाह्य स्रोत कर्मचारी वैभव इंगळे (वय २४) यांचा करंट लागून दुर्दैवी मृत्यू झाला. भर पावसात खांबावर चढून काम सुरू असताना जनरेटरच्या रिव्हर्स प्रवाहामुळे खांबावरच करंट लागून ते खाली कोसळले. गंभीर अवस्थेत रुग्णालयात हलविण्यात आले; मात्र डॉक्टरांनी तपासणीअंती त्यांना मृत घोषित केले. याबाबत सविस्तर वृत्त असे की,नांदगाव पेठ एमआयडीसीमध्ये शुक्रवारी सायंकाळी ६ वाजताच्या दरम्यान वीजपुरवठा खंडित झाल्यामुळे तो सुरळीत करण्यासाठी महावितरणचे बाह्यस्रोत कर्मचारी वैभव इंगळे रा. डिगरगव्हाण हे तातडीने खांबावर चढून वीजपुरवठा सुरळीत करण्याचा प्रयत्न करत होते



मात्र.कंपन्यांमध्ये असलेल्या मोठमोठ्या जनरेटरचा रिव्हर्स प्रवाह आल्यामुळे वैभव इंगळे यांना विजेचा मोठा झटका लागला आणि ते खाली कोसळले. अचानक घडलेल्या या घटनेमुळे सर्वच कर्मचारी भयभीत झाले होते. खाली पडलेल्या वैभव इंगळे यांना तातडीने रुग्णवाहिकेद्वारे रुग्णालयात दाखल केले मात्र उपचारापूर्वीच वैभव इंगळे यांनी जगाचा निरोप घेतला होता. वैभव इंगळे हे मूळचे डिगरगव्हाण येथील रहिवासी असून गेल्या वर्षीच त्यांचा विवाह झाला होता. या घटनेने नांदगाव पेठ एमआयडीसी सह संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त होत असून महावितरणच्या कर्मचारी बांधवांतही शोककळा पसरली आहे. वीज कर्मचाऱ्यांच्या जिवावर बेतणाऱ्या धोका-दायक कामाच्या परिस्थितीकडे यानिमित्ताने गंभीर लक्ष वेधले जात आहे.

# पुढचे सहा दिवस विदर्भातील 'या' जिल्ह्यांना पावसाचा जोरदार फटका!

## दसऱ्यापर्यंत पावसाचा रोख कसा बदलणार?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती** - चांद्यापासून बांद्यापर्यंतच्या लोकांना हैराण करणारा पाऊस आणखी म्हणजे दसऱ्यापर्यंत पिच्छा सोडणार नाही, अशी स्थिती आहे. पुढचे सहा दिवस विदर्भात मध्यम, तर उर्वरित महाराष्ट्रात जोरदार ते अतिजोरदार पाऊस होईल, अशी शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे. त्यामुळे नद्यांच्या परिसरात पुन्हा पूर परिस्थिती निर्माण होईल, अशी भीती आहे. विदर्भात चंद्रपूर, गडचिरोलीत जोरदार पावसाची शक्यता आहे.

मध्य व वायव्य बंगाल उपसागरादरम्यान हवेच्या कमी दाबाचे क्षेत्र निर्माण झाले असून २७ रोजी सकाळपर्यन्त हवेच्या तीव्र कमी दाबात रूपांतरीत होण्याची शक्यता आहे. ही स्थिती चंद्रपूर, हिंगोली, पैठण, अहिल्यानगर मार्गे मुंबईकडे मार्गक्रमनाच्या शक्यतेमुळे संपूर्ण महाराष्ट्रात शनिवारपासुन दसऱ्यापर्यंतच्या ६ दिवसात जोरदार पावसाची शक्यता निर्माण झाली आहे. विदर्भाच्या नागपूर, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, भंडारा व पश्चिम विदर्भात अमरावती, यवतमाळ, वाशिम जिल्ह्यात मध्यम ते जोरदार पाऊस होईल, असा अंदाज आहे. त्यानंतर पुढचे पाच दिवस २ ऑक्टोबरपर्यंत विजांच्या कडकडाटासह हलका ते मध्यम पाऊस होत राहिल, अशीही शक्यता वर्तवण्यात आली आहे. ३ ऑक्टोबरनंतरच बऱ्यापैकी उघडीप मिळण्याचा अंदाज आहे.

# सततच्या पावसामुळे भाजी बाजार मध्ये भाज्यांची आवक मंदावली

## पालेभाज्या १०० ते १६० रुपये प्रती किलोवर:

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती-**
पालेभाज्यांना जास्त प्रमाणात ऊन, पाऊस सहन होत नाही. त्यामुळे त्यांची विक्रेते विशेष काळजी घेत असतात. परंतु, यंदा सतत पाऊस सुरू असल्यामुळे ऐन उत्सवाच्या काळात उत्तम दर्जाच्या पालेभाज्या भाजीबाजारात मिळणे कठीण झाले आहे.

पावसाचा मार बसल्यामुळे शेतात पालेभाज्या मान टाकत आहेत. त्यामुळे ज्या पालेभाज्या काहीशा सुस्थितीत असतात त्या बाजारात विक्रीसाठी आणल्या जात असून त्यांचाही दर्जा हा फारसा चांगला नसतो. तरीही पालक, कोथिंबिर, मेथी, आंबटचुका, चवळी, शेपू, लाल माठ, अंबाडी या भाज्यांची किंमत १०० ते १६० रुपये किलोवर पोहोचली आहे. एखादवेळी भाजीचा दर्जा उत्तम असेल तर १७० रु. किलोपर्यंत भाव वाढत आहेत.

सध्या सण-उत्सव सुरू असून मोठ्या मंदिरांमध्ये दररोज भाविकांना महाप्रसाद दिला जातो. त्यासाठी दररोज कोथिंबिर, काही पालेभाज्यांची



आवश्यकता असते. त्यामुळे पालेभाज्यांना सध्या मागणी वाढली आहे.

पालक, आंबटचुका, अंबाडी, मेथी, चवळी या भाज्या देवीला सकाळी नैवेद्यासाठी लागतात. मात्र, सतत सुरू असलेल्या पावसामुळे उत्तम दर्जाच्या पालेभाज्या मिळेनाशा झाल्या आहेत. ठोक बाजारातील आवकही कमी झाली आहे. कोथिंबीर खुडल्यासारखी, काहीशी पिवळट मिळत आहे. त्यातच हिरवी कोथिंबीर मात्र भाव खाऊन जात आहे. हीच स्थिती इतर पालेभाज्यांची आहे.

पालक, कोथिंबीर ही बारमाही मिळते परंतु आंबटचुका, मेथी, लाल माठ, शेपू, चवळी, अंबाडी या पालेभाज्या साधारणत: सप्टेंबर, ऑक्टोबरपासून मिळण्यास सुरुवात होते. त्यामुळे या नुकत्याच बाजारात आल्या आहेत. त्यांनाही पावसाचा तडाखा बसल्यामुळे ज्या भाज्या काहीशा सुस्थितीत बाजारात विक्रीसाठी उपलब्ध होत आहेत, त्यांचे भाव वाढले आहेत, अशी माहिती पालेभाज्यांविक्रेत्यांनी दिली .

# अखंड ज्योत सप्ताह सोहळ्याला भाविकांची उत्स्फूर्त उपस्थिती

## मालखेड रेल्वे येथे अंबादेवी नवरात्र उत्सवात ७०० घटांची स्थापना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७चांदूर रेल्वे :**
बॉटमतालुक्यातील भानामती नदीच्या काठावर वसलेल्या निसर्गरम्य मालखेड गावात ग्रामदैवत अंबामाता आणि शिवशंकर मंदिरात नवरात्रोत्सव भक्तीमय वातावरणात उत्साहाने सुरू आहे. यावर्षी नवरात्र महोत्सवाच्या अखंड ज्योत सप्ताहात तब्बल ७०० घटांची स्थापना करून हा धार्मिक सोहळा भव्यतेने साजरा होत आहे. सकाळ-सायंकाळ होणाऱ्या महाआरतीला शेकडो भाविक उपस्थित राहून दर्शन घेत आहेत.

पुराणकालीन संदर्भानुसार विदर्भ प्रदेशाचा राजा वृषभदेव याला दहा पुत्र होते. त्यापैकी एकाचा नाव केतुमाल होता. राजधानीच्या परिसरात मुलांना निवासस्थाने देण्यात आली होती. केतुमालाच्या नावावरून जी वस्ती निर्माण झाली, तिला सुरुवातीस 'मालकेतू' म्हणून ओळखले जाई. कालांतरानेयाच नावाचा अपभ्रंश होऊन 'मालखेड' हे नाव रूढ झाले.

श्रीमद् भागवत व देवी भागवत ग्रंथातही मालकेतू वस्तीचा उल्लेख आढळतो. केतुमालाने भानामती नदीच्या काठावर अंबामातेची भक्तिभावाने आराधना केली.

त्याच्या उपासनेने प्रसन्न होऊन अंबा माता प्रकट झाल्याची आख्यायिका आहे. भक्तांच्या मनोकामना पूर्ण व्हाव्यात, या हेतूने देवी येथेच स्वयंभू स्वरूपात विराजमान झाली, असे मानले जाते.



त्यामुळे दरवर्षी ही परंपरा आवरत सुरु असून यावर्षी ७०० घटांची स्थापना करून सोहळ्याला नवी उंची मिळाली आहे. घटांची संख्या वर्षानुवर्षे वाढत चालली आहे. सकाळ-सायंकाळहोणाऱ्या महाआरतीदरम्यान भजन, कीर्तन, देवी स्तोत्र पठण यामुळे मंदिर परिसर भक्तिरसात न्हाऊन निघतो.मालखेडवासीयांचे ग्रामदैवत म्हणून अंबादेवीची ओळख आजही आहे. सातारा जिल्ह्यात असणाऱ्या बऱ्याच खेडचा-गावाची मालखेडवासिनी अंबामाता कुलदैवत असल्याने वर्षभर तेथील भाविकांची रेलचेल मंदिरात पाहायला मिळते शिवाय या नवरात्र उत्सवात तेथील भाविकांचेदेखील घट आहेत.

### नवरात्रोत्सवाची परंपरा

१९९७ साली अखंड ज्योत स्थापनेची परंपरा सुरूझाली. तेव्हापासून दरवर्षी ही परंपरा अविरत सुरू असून यावर्षी ७०० घटांची स्थापना करून सोहळ्याला नवी उंची मिळाली आहे. घटांची संख्या वर्षानुवर्षे वाढत चालली आहे. सकाळ-सायंकाळहोणाऱ्या महाआरतीदरम्यान भजन, कीर्तन, देवी स्तोत्र पठण यामुळे मंदिर परिसर भक्तिरसात न्हाऊन निघतो.-

# सायफेस्ट २०२५ : विज्ञान-आध्यात्माचा मेळा; उद्घाटन सोहळ्यात डॉ. गायकवाड यांचे विचार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती**

विठ्ठल हे महाराष्ट्राचे आराध्य दैवत आहे. त्यांच्या वारीसाठी लाखो वारकरी पायी दरवर्षी नित्यनेमाने विठ्ठलाकडे जातात. हा एक प्रकारचा ध्यास आहे. त्याप्रमाणे विज्ञान पंढरीचे वारकरी बनून आधुनिक युगात विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा प्रयोग करून विज्ञानाची जीवनाशी सांगड घालून विज्ञानाच्या ध्यासासाठी आपल्याला निरंतर प्रवास करायचा आहे. सात्त्विक अन्नाशिवाय जीवनाची पवित्रता नाही म्हणूनच विठ्ठलाची ही वारी म्हणजे विज्ञान आणि अध्यात्म यांचा संगम आहे, असे प्रतिपादन प्रमुख वक्त्या डॉ. अलका गायकवाड यांनी केले.विद्याभारती महाविद्यालय कॅम्प, अमरावती येथे गुरुवारी महाविद्यालयातील श्रोतृगृहात सायफेस्ट २०२५ विज्ञानोत्सवाचे उद्घाटन पार पडले. या वेळी त्या प्रमुख वक्त्या म्हणून बोलत होत्या. व्यासपीठावर विद्याभारती शैक्षणिक मंडळाच्या उपाध्यक्ष मेजर डॉ. मिथिलेश राठौर, प्राचार्य डॉ. प्रज्ञा येनकर, भारतीय महाविद्यालयातील माजी मराठी विभाग प्रमुख डॉ. अलका गायकवाड, आयक्युएसी समन्वयक डॉ. पी. जी. बनसोड, डॉ. रजनी गजबे, डॉ. जी. टी. लामधाडे, डॉ. वाय. डी. आखरे, प्रा. अथर इक्बाल, डॉ. पी. पी. खाडे, डॉ. योगिता धोटे, डॉ. शिल्पा सरवय्या आदी विभाग प्रमुख उपस्थित होते. डॉ. गायकवाड



यांनी विज्ञान पंढरीचे वारकरी या विषयावर ओघवत्या शैलीत अनेक मुद्यांना स्पर्श केला. त्या म्हणाल्या, की कुठली श्रद्धा प्रेरणा देते, श्रद्धा आणि अंधश्रद्धा यांच्या सीमारेषा ठरवता आल्या पाहिजे. म्हणून विज्ञानाचा धर्म विज्ञानाची वारी आपण आता स्वीकारली पाहिजे. विज्ञानाच्या विद्यार्थ्यांमध्ये करुणा असायला पाहिजे. विज्ञानाचे तत्त्व सांगते अन्नाविना जीवन नाही; पण अध्यात्माची शिकवण आहे. आधुनिक युगात आपण ती विज्ञानरूपी वारी म्हणून स्वीकारली पाहिजे, असेही त्या म्हणाल्या. डॉ. गायकवाड यांनी संत गाडगेबाबा, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, महात्मा फुले, कवयित्री बहिणाबाई यांच्या विचारांचे दाखले देऊन आपले विचाराला पुष्टी दिली.

तत्पूर्वी, प्रास्ताविकातून डॉ. पी. जी. बनसोड यांनी पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी आयोजित सायफेस्ट २०२५ च्या आयोजनामागील भूमिका विशद केली. मेजर डॉ. मिथिलेश राठौर यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अनुषंगाने आंतरविद्या शाखीय अभ्यासाला सुरुवात झालेली आहे. त्याचाच परिपाक म्हणजे आज सायफेस्टच्या बीज भाषणाकरिता मराठीच्या साहित्यिक संशोधक डॉ. अलका गायकवाड यांना पाचारण केल्याचे सांगितले आहे. सूत्रसंचालन डॉ. मोनाली घुरडे यांनी केले, तर आभार डॉ. विजय मसंद यांनी मानले. या कार्यक्रमाला सर्व विभागाचे विभाग प्रमुख, प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

### विद्यार्थ्यांमध्ये चैतन्य निर्माण करणे होय :

डॉ. येनकर अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना प्राचार्य डॉ. प्रज्ञा येनकर म्हणाल्या, की या विज्ञानोत्सवाचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये चैतन्य निर्माण करणे होय. तसेच त्यांच्यामधील चिकित्सक व संधोधनवृत्ती जागृत करणे हा आहे.

# संत्रा गुणवत्ता वाढीसाठी नर्सरी कायद्यात बदल

## नितीन गडकरी मुख्यमंत्री, कृषी मंत्र्यांशी चर्चा करणार



**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७नागपूर–** केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी संत्र्याच्या गुणवत्तेत सुधारणा करण्यासाठी आणि ते जागतिक बाजारपेठेत निर्यातक्षम बनवण्यासाठी नर्सरी कायद्यात बदल करण्याची गरज व्यक्त केली आहे. यासाठी ते लवकरच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आणि केंद्रीय कृषी व फलोत्पादन मंत्र्यांशी चर्चा करणार आहेत. 'उत्तम नर्सरीचे नियोजन आणि संत्रा उत्पादकांसाठी सुधारित धोरण' या विषयावरील बैठकीत गडकरी बोलत होते. संत्र्याचे उत्पादन आणि गुणवत्ता वाढवण्यासाठी रोगमुक्त व उच्च प्रतीच्या कलमांची नर्सरी शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. यासाठी सरकार, कृषी विद्यापीठे आणि राष्ट्रीय लिंबूवर्गीय फळ संशोधन संस्था यांनी कार्यपद्धती निश्चित करावी, असे आवाहन त्यांनी केले.स्पेन आणि इजरायलमध्ये पाहिलेले फलोत्पादनातील आधुनिक तंत्रज्ञान व नर्सरी व्यवस्थापन भारतातही आत्मसात केले पाहिजे, असे गडकरी म्हणाले. यामुळे उत्पादन आणि उत्पन्न दोन्ही वाढेल. राज्यातील सध्याच्या नर्सरी कायद्यात सुधारणा करून दर्जेदार आणि रोगमुक्त रोपवाटिका उभारण्यासाठी धोरण तयार केले जावे, असा आग्रह राज्य आणि केंद्र सरकारकडे धरणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या बैठकीला ज्येष्ठ कृषी तज्ज्ञ डॉ. सी. डी. मायी, आंबा विषयातील तज्ज्ञ डॉ. भगवानराव कापसे, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ. पंचभाई, फळशास्त्र विभाग प्रमुख डॉ. शशांक भराड, जिल्हा कृषी अधीक्षक रवींद्र मनोहरे, राष्ट्रीय लिंबूवर्गीय संशोधन केंद्राचे डॉ. दास, महा ऑरेंजचे अध्यक्ष श्रीधरराव ठाकरे, ॲग्रोव्हिजनचे सुधीर दिवे, डॉ. प्रवीण भालेराव यांच्यासह अनेक नर्सरीधारक आणि संत्रा उत्पादक शेतकरी उपस्थित होते. बैठकीत डॉ. शशांक भराड यांनी नर्सरी संचालनाचे निकष, आवश्यक गुंतवणूक, मातृवृक्ष बागेचे नियोजन आणि संत्रा रोपे खरेदी करताना शेतकऱ्यांनी घ्यायची काळजी यावर सादरीकरण केले. डॉ. पंचभाई यांनी रूटस्टॉक व पारंपरिक नर्सरींच्या मर्यादा आणि रोगांविषयी माहिती दिली. जिल्हा कृषी अधीक्षक रवींद्र मनोहरे यांनी राज्यातील नर्सरी कायद्यावर सादरीकरण करताना सुचवलेल्या सुधारणा स्पष्ट केल्या. डॉ. सी. डी. मायी यांनी कृषी विद्यापीठांनीही दर्जेदार रोपवाटिकेची जबाबदारी घ्यावी, अशी सूचना केली. संत्रा उत्पादक, नर्सरीधारक, कृषी विद्यापीठे आणि शासनाच्या कृषी विभागाच्या संयुक्त बैठकीत या विषयावर धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी चर्चा झाली. सुधीर दिवे यांनी प्रास्ताविक केले. संत्रा उत्पादक शेतकऱ्यांसाठी हा निर्णय महत्त्वाचा ठरेल, असा विश्वास या बैठकीत व्यक्त करण्यात आला.

# वरूडचा आनुष आंतरराष्ट्रीय फिल्म फेस्टिव्हलसाठी स्पेनमध्ये दाखल

## वरुडचा मान उंचावला – FTII पुणे तर्फे निवड

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७वरूड,** शहरातील आनुष अश्वपाल वानखडे याने आंतरराष्ट्रीय स्तरावर आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला आहे. प्रतिष्ठित फिल्म अँड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया (ऋढखख), पुणे येथे डिरेक्शन या विषयात पीजी डिप्लोमा शिकत असलेल्या आनुषची स्पेन येथे होणाऱ्या जागतिक पातळीवरील फिल्म फेस्टिव्हलसाठी निवड झाली आहे. स्पेनमध्ये २१ ते २८ सप्टेंबर २०२५ दरम्यान आंतरराष्ट्रीय फिल्म फेस्टिव्हल पार पडणार आहे. ऋढखख पुणे तर्फे आनुष व त्याचा सहकारी मिलन कुमार (गुजरात) यांची निवड करण्यात आली. आनुष १९ सप्टेंबर रोजी भारतातून रवाना झाला असून तो २१ तारखेपासून स्पर्धात्मक उपक्रमात सहभागी झाला आहे. या फेस्टिव्हलमध्ये आनुष हा ज्युरी सदस्य म्हणून काम पाहणार आहे. जगभरातील नवोदित दिग्दर्शकांनी तयार केलेल्या शॉर्ट फिल्म्सचे मूल्यांकन करणाऱ्या पॅनेलमध्ये तो सहभागी होणार आहे. तसेच, नामवंत फिल्म मेकर्ससमोर स्वतःच्या आयडिया व शॉर्ट फिल्म्सबद्दल प्रेझेंटेशन करण्याचीही संधी त्याला मिळणार आहे. या व्यासपीठावरून आनुष व त्याचा सहकारी मिलन कुमार हे दोघे मिळून भारताचे प्रतिनिधित्व करणार आहेत. फेस्टिव्हल तीन वेगवेगळ्या विभागांमध्ये पार पडणार असून आनुष हा विदर्भातील एकमेव विद्यार्थी असल्याचा मान त्याला



मिळाला आहे. या प्रवासाकरिता विशेष मदत करणारे नितीन बनसोड, अमोल कुकडे, राहुल वानखडे, तन्वी पुरोहित, आदित्य व शिखा तिडके यांचे तो मनापासून आभार मानतो, वरूडच्या या रत्नाने आंतरराष्ट्रीय पातळीवर टाकलेली झेप स्थानिकांसाठी अभिमानाची बाब ठरली आहे. आनुषच्या या यशामुळे तरुणाईसाठी नवी प्रेरणा निर्माण झाली असून त्याचे निनादताई गव्हाड, गोपाळ तायवाडे, वासुदेव लांडगे, माजी प्राचार्य निशिकांत बेलसरे, माजी बांधकाम सभापती गिरीश कराळे, मोरेश्वर वानखडे,मुख्याध्यापक नितीन ठाकरेसह असंख्य हितचिंतकांकडून अभिनंदन होत आहे.–

# RSS च्या शताब्दी वर्षाचे काँग्रेस नेत्यांना निमंत्रण

## राऊत, ठाकरेंनी निमंत्रण स्वीकारले, पण विचारांचा दाखला देत कार्यक्रमाला न जाण्याचा निर्णय

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७नागपूर–** राष्ट्रीय स्वयंसेवक संघ शताब्दी वर्ष साजरे करीत आहे. शंभरावे वर्षे सर्वांच्या स्मरणात राहावे यासाठी यंदाचा विजयादशमी सोहळाही तेवढाच संस्मरणीय व्हावा यासाठी प्रयत्न केले जात आहे. प्रमुख पाहुणे म्हणून माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद या सोहळ्याला उपस्थित राहणार आहेत. या सोहळ्यात सर्वांनी सहभागी व्हावे आणि याचे साक्षीदार व्हावे याकरिता फक्त भाजपच नव्हे तर सर्वच राजकीय पक्षांच्या लोकप्रतिनिधी, आमदार आणि पदाधिकाऱ्यांना आमंत्रित केले जात आहे.नागपूर शहरातील काँग्रेसचे आमदार विकास ठाकरे, उत्तर नागपूरचे आमदार व माजी मंत्री नितीन राऊत, ज्येष्ठ काँग्रेस नेते विलास मुत्तेमवार तसेच सतीश चतुर्वेदी यांनाही संघाच्यावतीने त्यांच्या घरी जाऊन निमंत्रण देण्यात आले. नितीन राऊत यांनी संघाचे निमंत्रण स्वीकारले. मात्र भिन्न विचारधारेमुळे उपस्थित राहता येणार नाही असे सांगून त्यांनी नम्रपणे आपला नकार कळविला.स्थापनादिनानिमित्त दरवर्षी संघाच्यावतीने रेशीमबाग मैदानावर विजयादशमी सोहळा साजरा केला जातो. या सोहळ्याला विविध क्षेत्रातील मान्यवरांना प्रमुख अतिथी म्हणून बोलावले जाते. सरसंघचालक या सोहळ्याच्या माध्यमातून उपस्थितांना मार्गदर्शन करतात. काही संदेशही देतात. संघाची पुढील वाटचाल आणि दिशाही सांगितली जाते. त्यामुळे देशभरातील स्वयंसेवकांचे सरसंघचालकांच्या भाषणाकडे लक्ष लागले असते. संघासोबत बांधिलकी असलेले मोठमोठे नेते आणि प्रतिष्ठित



व्यक्ती या सोहळ्याला आवर्जून हजेरी लावतात. केंद्रीयमंत्री नितीन गडकरी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस संघाच्या गणवेशात उपस्थित असतात.विजयादशमी सोहळ्याच्या निमंत्रणाची जबाबदारी प्रत्येक प्रभागातील स्वयंसेवकांवर सोपविली जाते. त्यांच्या मार्फत त्या त्या भागातील प्रतिष्ठितांना निमंत्रित केले जाते. मात्र यंदाचा शताब्दी सोहळा असल्याने राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांवर शहरातील प्रतिष्ठित नागरिकांना निमंत्रण देण्याची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. शहर काँग्रेसचे अध्यक्ष आणि आमदार विकास ठाकरे यांच्या घरी जाऊन त्यांना विजयादशमीचे सोहळ्याला येण्याचे निमंत्रण देण्यात आले. ठाकरे यांना अनेक वर्षांपासून निमंत्रण दिले जात आहे. त्यांच्यासोबत नितीन राऊत यांनाही संघाचे प्रमुख अधिकाऱ्यांनी सोहळ्याला उपस्थित राहण्याचे निमंत्रण दिले. राऊत यांनी त्यांचे निमंत्रण स्वीकारले. सोहळ्याला शुभेच्छा दिल्या. मात्र काँग्रेसची विचारधारा वेगळी असल्याने या सोहळ्याला उपस्थित राहाता येणार नाही असे सांगून त्यांनी नम्रपणे आपला नकार कळवला.

# दर्यापूर नगर परिषद आरोग्य विभागाचे स्वच्छता अभियान जोमाने सुरू

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७दर्यापूर–** दर्यापूर नगर परिषदेच्या आरोग्य विभागाकडून स्वच्छता अभियान पंधरवडा या दर्यापूर नगर परिषदेचे तडफदार प्रशासक तथा मुख्याधिकारी मा.श्री. डॉ. विकास खंडारे यांचे कुशल मार्गदर्शनाखाली दि. १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर स्वच्छता ही सेवा म्हणून आरोग्य अभियान जोमाने राबविण्यात येत असून आरोग्य विभागाचे कर्तव्यदक्ष आरोग्य निरीक्षक श्री.परिमल देशमुख व त्यांचे सहाय्यक शेख शफिक शेख शरीफ हे शहरातील स्वच्छता राबविण्यासाठी अथक परिश्रम घेत आहेत. त्यांचे आरोग्य विभागाचे बाबू श्री. आरिफ भाई तसेच प्रभारी लिपिक श्री. जाकीर मो इस्माईल हे सफाई कामगाराकडून चांगला प्रकारे स्वच्छता अभियान राबवित असताना दिसत आहेत. आज दि.२६/९/




२०२५ रोजी समता मार्केट येथेही सर्व कचरा वगैरे साफ करून मार्केटमधील जागा स्वच्छ केली आहे येथे सफाई कामगार अ.हमिद शे.कासम, शे. शोएब शे.शकील,शे.आसिफ शे.युसुफ, सतीश कांतीलाल, कुरील चपराशी, राजू चक्रे, ट्रॅक्टर ड्रायव्हर व ठेकेदार अंकुश गाडेकर यांनी समता मार्केट स्वच्छमय केले आहे त्यामुळे नगरपरिषदेच्या आरोग्य विभागातील व स्वच्छता अभियान राबविणाऱ्या सफाई कामगार व सर्व कर्मचाऱ्यांचे समता मार्केट मधिल सर्व दुकाण मालकांनी अभिनंदन केले.

# कर्जबाजारीपणाने व अति पावसाने शेतकऱ्याची आत्महत्या

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७दर्यापूर–** अति पाऊस व कर्जबाजारीपणाचा ताण सहन न झाल्याने दर्यापूर तालुक्यातील लेहगाव रेल्वे येथील शेतकरी श्रीधर प्रल्हादराव कोल्हे (वय ५०) यांनी शुक्रवारी सकाळी गळफास घेऊन आत्महत्या केली.



गेल्या पन्नास वर्षांत इतका पाऊस पडला नव्हता, असा विक्रमी पाऊस यावर्षी झाल्याने श्रीधर कोल्हे यांच्या दोन एकर शेतीतील पीक पूर्णपणे नष्ट झाले. त्यांच्यावर सुमारे ५० हजार रुपये बँकेचे तसेच खासगी कर्जाचे ओझे होते. या ताणतणावातून मार्ग न सापडल्याने त्यांनी जीवन संपविले.

मृत्युसमयी त्यांच्या पाठीमागे वयोवृद्ध आई, पत्नी, एक मुलगा व एक मुलगी असा आप्तपरिवार आहे. त्यांच्या निधनाची बातमी कळताच परिसरात शोककळा पसरली. खासदार बळवंत वानखडे यांनी दुःख व्यक्त केले असून, अंत्यविधीप्रसंगी माजी सरपंच राजीव राजेश्वर पाटील कोल्हे, माजी उपसरपंच राजू नागे आदी मान्यवर उपस्थित होते.सायंकाळी शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार पार पडले.–

# तालुक्यातील ग्राम बोराळा येथे शेतकऱ्याची आत्महत्या

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७दर्यापूर–** तालुक्यातील खल्लार पोलीस स्टेशन अंतर्गत येत असलेले ग्राम बोराळा येथे शेतकऱ्याने विष प्राशन करून आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे. आत्महत्या केलेल्या इसमाचे नाव पुरुषोत्तम शहदेवराव तायडे वय वर्ष अंदाजे ४५ असे आहे. सदर शेतकरी हा

कर्जबाजारी झाल्यामुळे आत्महत्या केल्याचे समजत आहे.. मृतक शेतकऱ्यावर मायक्रो फायनस प्रा. ली. कंपनीचे कर्ज होते त्या कर्जाला कंटाळून तसेच शेतातील नापीकीमुळे कर्जाचा बोजा न सांभाळल्या गेल्यामुळे पुरुषोत्तम शहदेवराव तायडे त्यांनी आपली स्वताची जिवण यात्रा विष प्राशण करून संपवली. पुरुषोत्तम तायडे यांच्या आत्महत्येने त्यांच्या परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.त्यांच्या पश्चातत्यांच्या कुटुंबात पत्नीच नाव : प्रतिक्षा पुरुषोत्तम तायडे वय – ३५ वर्षे व लहान तीन अपत्य असून दोन मुली एक मुलगाबोराळा गावामध्ये तसेच संपूर्ण पंचक्रोशी मध्ये एकच खळबळ व्यक्त होत आहे.

# शेअर मार्केट गुंतवणुकीच्या नावावर ७० लाखांची फसवणूक

## आरोपी नालासोपारा, पालघर येथुन गजाआड, सायबर पोलीस स्टेशनची कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७अमरावती :** शेअर मार्केटमध्ये गुंतवणुकीच्या नावावर इसमाची ७० लाख रुपयांची ऑनलाईन फसवणूक केल्याची घटना अमरावती शहरात घडली. सायबर पोलिसस्टेशनच्या पथकाने नालासोपारा पालघर मुंबई येथून आरोपीला गजाआड केले आहे.

६ऑगस्ट रोजी तक्रारदार यांना शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक करण्यासाठी हॉटस्अॅप ग्रुपमध्ये जोडण्यात आले व त्याना क्यूआयबी, ब्लॉक ट्रेडिंग, आयपीओ आणि ओटीसी ट्रेडिंगद्वारे शेअर बाजारात उच्च नफा मिळवण्याचे आश्वासन देवून त्यांची एकूण ७० लाख ६ हजार ४७ रुपये २० पैसे इतक्या रक्कमेची ऑनलाईन फसवणूक झाली होती. यावरून सायबर पोलिस ठाणे अमरावती शहर येथे गुन्हा नोंदकरण्यात होता.

या गुन्ह्यात केलेल्या तपासात फिर्यादी यांची फसवणूक झालेल्या ७० लाख रकमेपैकी ३ लाख रुपये आर.



बी. एल. बैंक चाअकाऊंट धारक आरोपी मंजीत मनविरसिंग टाक, (२५), व्यवसाय प्रॉपर्टी डिलर, रा. ई ९०३ यशवंत एम्पायर, डि-मार्ट जवळ, नालासोपारा पूर्व जि. पालघर या आरोपीच्या अकाऊंटमध्ये क्रेडीट झाले व आरोपीने सदरची रक्कम वेगवेगळया अकाउंटवर ट्रान्सफर केल्याचे तपासात निष्पन्न झालेः परंतु सदर रकमेला लिन मार्क लावण्यात आला आहे. पोलिसस्टेशन सायबरचे ए. पी. आय.अनिकेत कासार, पो.हे.कॉ. उल्हास टवलारे पो. कॉ. अभिराज इंदुरकर व पो. कॉ. अनिकेत वानखडे यांचे तपास पथक तयार करून पुणे, मुंबई, ठाणे पालघर येथे रवाना करण्यात येवून नालासोपारा येथून सदर आरोपीस ताब्यात घेवून त्याच्याकडुन सॅमसंग कंपनीचा मोबाईल हॅन्डसेट किंमत ७५०० रुपये जप्त करण्यात आला आहे. आरोपीचा पोलिस कोठडी रिमांड घेण्यात आला आहे.गुन्ह्यातील आणखी आरोपीचाशोध घेणे सुरु आहे. ही कामगिरी पो. नि. महेन्द्र अंभोरे, प्रियंका कोटावार, अनिकेत कासार, उल्हास टवलारे, निखील माहुरे अभिराज इंदुरकर, अनिकेत वानखडे व वसिम खान, सुषमा आठवले यांनी केली आहे.

# सोयाबीन, कापूस, संत्राचे तत्काळ पंचनामे करावेत- पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती**

गेल्या काही दिवसात जिल्ह्यात सर्वत्र झालेल्या पावसामुळे शेत पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. सततच्या पावसामुळे पोषक वातावरण नसल्याने सरसकट नुकसान झाले आहे. अशा परिस्थितीमध्ये शेतकऱ्यांना शासनाकडून मदत होण्यासाठी सोयाबीन, कापूस, संत्रा पिकांचे तातडीने पंचनामे करावेत, असे निर्देश पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले.जिल्हा परिषदेतील सभागृहात आज विविध विषयांचा आढावा घेण्यात आला. यावेळी खासदार डॉ. अनिल बोंडे, आमदार रवी राणा, प्रताप अडसड, राजेश वानखेडे, प्रवीण तायडे, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र आदी उपस्थित होते.जिल्ह्यातील गेल्या काही दिवसामध्ये झालेल्या पावसामुळे शेत पिकाचे नुकसान झाले आहे. त्यामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना शासनाकडून मदतीची अपेक्षा आहे. याबाबत लोकप्रतिनिधींनी पालकमंत्री यांच्याकडे अपेक्षा व्यक्त केली. शासनाच्या नियमानुसार एका मंडळात ६५ मिलिमीटर पेक्षा जास्त पावसाची नोंद किंवा पूर परिस्थिती आलेल्या भागात शेतपिकाच्या नुकसानीचे पंचनामे करण्यात येत आहे. मात्र सप्टेंबर महिन्यात झालेल्या सततच्या पावसामुळे हाती आलेले पीक पूर्णपणे नष्ट झाले आहे. त्यामुळे सरसकट पंचनामे हाती घेण्यात यावे. यासाठी कृषी विभागासह महसूल विभागानेही तातडीने पावले उचलावीत. येत्या कालावधीत मंत्रिमंडळाच्या बैठकीत याबाबत चर्चा करून शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी मदत होईल, अशा प्रकारे निर्णय घेण्यात येईल. नुकसान भरपाई पोटी १०८ कोटींचा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. यासाठी याद्या तातडीने अपलोड करण्यात याव्यात.बेघरांना घरे मिळण्यासाठी पट्टेवाटप हा महत्त्वाचा कार्यक्रम शासनाने हाती घेतला आहे. प्रामुख्याने ग्रामीण भागात याबाबत तातडीने कारवाई करून जिल्हाभरात पन्नास हजार पट्टेवाटप करण्याची उद्दिष्ट ठेवावे. यासोबतच पाण्याची पातळी वाढवण्यासाठी जलसंधारणाची कामे उत्तम प्रकारे करण्यावर भर देण्यात यावा. जिल्ह्यातील तलावांच्या दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करून देण्यात येईल. याचा योग्यप्रकारे विनीयोग व्हावा. तसेच जुने झालेले जलसंधारणाचे बंधारे पुनर्जीवित करण्यासाठी प्रयत्न करण्यात यावेत. तसेच लाडकी बहिणी योजनेत असंख्य महिलांची नावे वगळल्याने त्यांना मिळणारी मदत बंद झाली आहे. याबाबतही अपात्र महिलांची यादी तातडीने लोकप्रतिनिधींना पुरविण्यात यावी.यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती महापात्र यांनी जिल्हा परिषदेतर्फे राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांचे सादरीकरण केले.

# भाजपचे राज्यस्तरीय नेत्यांचे पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुपमध्ये स्वागत...




पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप, अमरावती यांच्या ऑडिटोरियममध्ये आयोजित विशेष मेळाव्यात महाराष्ट्र राज्याचे महसूल मंत्री मा. श्री. चंद्रशेखरजी बावनकुळे व भाजपा महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष मा. श्री. रविंद्रजी चव्हाण यांचे संस्थेचे उपाध्यक्ष श्री. श्रेयशदादा पोटे पाटील यांनी संस्थेच्या वतीने मनःपूर्वक स्वागत केले.

# गुरुदेव नगर ते डवरगाव रोडची तातडीने दुरुस्ती करण्यात यावी - नागरिकांची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७मोझरी**



गुरुदेव नगर ते डवरगावमार्गे दासटेकडी हा मुख्य रस्ता सध्या अत्यंत खराब स्थितीत असून अनेक ठिकाणी मोठमोठे खड्डे पडले आहेत. हा मार्ग राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या पुण्यतिथी महोत्सवाच्या काळात भाविकांच्या दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाचा आहे. येत्या ७ ऑक्टोबरपासून सुरू होणाऱ्या पुण्यतिथी महोत्सवात या मार्गावरून पालखी पदयात्रा व भाविकांची मोठी वर्दळ होणार आहे.

या मार्गावरून अनेक पालख्या दासटेकडीवर मुक्कामी येतात, त्यामुळे रस्त्याची सध्याची खराब अवस्था भाविकांसाठी गैरसोयीची ठरणार आहे. खड्ड्यांमुळे भाविकांना ठेचाळत जावे लागेल, आणि अपघाताचीही शक्यता नाकारता येत नाही.म्हणून भाविकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने आणि महोत्सव सुरळीत पार पडावा यासाठी पुण्यतिथीपूर्वीच या रस्त्याची तातडीने डागडुजी व दुरुस्ती करण्यात यावी, अशी मागणी स्थानिक नागरिक व भाविकांच्या वतीने करण्यात येत आहे.

# आयएनएसच्या कार्यकारीणीवर विलास मराठे बिनविरोध

## अध्यक्षपदी विवेक गुप्ता, डेप्युटी प्रेसिडंट पदावर करण दर्डा तर उपाध्यक्षपदी तन्मय माहेश्वरी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती,**

देशातील वृत्तपत्र मालकांची सर्वोच्च संस्था इंडियन न्यूज पेपर सोसायटी नवी दिल्लीच्या (आयएनएस) कार्यकारीणीत दै. हिदुस्थानचे प्रबंध संपादक विलास अरुण मराठे यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. सोसायटीच्या अध्यक्षपदी सन्मार्ग कोलकाताचे विवेक गुप्ता यांची एकमताने



निवड करण्यात आली. डेप्युटी प्रेसिडंट पदी दै. लोकमतचे करण राजेंद्र दर्डा तर उपाध्यक्षपदी अमर उजालाचे तन्मय माहेश्वरी यांची निवड करण्यात आली.आयएनएसची वार्षिक सर्वसाधारण सभा आज गुरुवारी दि.२५ रोजी ऑनलाईन पद्धतीने घेण्यात आली. या ऑनलाईन बैठकीत कार्यकारीणी सदस्य, अध्यक्ष वा पदाधिकारी निवडीची प्रक्रीया पार पडली. सभेत विलास अरूण मराठे यांची कार्यकारीणी सदस्य म्हणून निवड करण्यात आली. कार्यकारीणीत दै. लोकमत वृत्तपत्त समुहाचे अध्यक्ष माजी राज्यसभा अध्यक्ष डॉ. विजय दर्डा यांचा देखील समावेश आहे. याशिवाय सकाळ वृत्तपत्र समुहाचे प्रमुख प्रतापराव पवार, बेळगाव तरूण भारतचे समूह प्रमुख, सल्लागार डॉ. किरण ठाकुर, दै. पुढारी कोल्हापुरचे डॉ. योगेश जाधव आदी सन्मानित सदस्यांचा समावेश आहे.नवीन कार्यकारणीमध्ये खजिनदार म्हणून गृहशोभिकाचे अनंतनाथ यांची निवड करण्यात आली. सेक्रेटरी जनरल म्हणून मेरी पॉल या काम पाहणार आहेत. नूतन कार्यकारीणीत एस. बालसुब्रम्हण्यम आदित्यन (डेली थान्धी), गिरीष अग्रवाल (दै. भास्कर, भोपाल), समाहित बल(प्रगतीवादी), समुद्र भट्टाचार्य (हिदुस्थान टाईम्स, पाटणा), पद्मभुषण होरमुसजो एन. कामा (मुंबई समाचार), गौरव चौप्रा (फिल्मी दुनिया), विजय कुमार चोप्रा (पंजाब केसरी जालंधर), डॉ. विजय जवाहरलाल दर्डा (लोकमत नागपुर), पद्मश्री जगजीत सिग दर्दी (छर्दीकला डेली), पल्लवी एस. डेम्पो (द. नवहिद टाईम्स), विवेक गोयंका (दि इंडियन एक्सप्रेस, मुंबई), महेंद्र मोहन गुप्ता (दै. जागरण), प्रदिप गुप्ता (डाटाक्वेस्ट), संजय गुप्ता (दै.जागरण, वाराणसी), शैलेश गुप्ता (मिड-डे), शिवेंद्र गुप्ता (बिझनेस स्ट्रेंडर्ड), डॉ. योगेश जाधव (पुढारी), राजेश जैन (न्यू इंडीया हेरॉल्ड), सरविंदर कौर (अजीत), विलास अरुण मराठे (दै. हिंदुस्थान अमरावती), हर्ष मॅथ्यू (वनिथा), दुर्भा मुखर्जी (आनंद बाजार पत्रिका), पी. व्ही. निधीश (बालाभूमी), प्रताप गोविंद पवार (सकाळ), राहुल राजखेवा (दि सेंटीनल), आर. एम. आर. रमेश (दिनकरन), अतीदेव सरकार (दि टेलीग्राफ), अमम एस. शहा (गुजरात समाचार, बडोदा अॅन्ड सूरत), डॉ. किरण डी. ठाकूर (तरूण भारत, बेळगांव), सौभाग्यलक्ष्मी कनकेल तिलक (मयूरा), बिजू वर्गीस (मंगलम प्लस), आय. व्यंकट (इनाडू), कुंदन आर. व्यास (व्यापार-जन्मभूमी), किरण बी. वडोदरीया (वेस्टर्न टाईम्स), सोमेश शर्मा (राष्ट्रदुत साप्ताहीक), जयंत मेमन मॅथ्यू (मल्यालम मनोरमा), एल. अदिमुलम (हेल्थ अँड द अँटीसेप्टीक), मोहित जैन (इकॉनॉमिक टाईम्स), के. आर. पी. रेड्डी (साक्षी), राकेश शर्मा (आज समाज), एम.व्ही. श्रेयम्स कुमार (मातृभूमी) यांचा समावेश आहे.

### सलग २३ व्यांदा विलास मराठे कार्यकारीणीवर

है. हिदुस्थानचे प्रबंध संपादक विलास अरूण मराठे यांची आयएनएसच्या कार्यकारीणीवर सदस्य म्हणून सलग २३ व्यांदा अविरोध निवड झाली आहे. या पूर्वी त्यांनी राज्य शासनाच्या अधिस्विकृती समितीचे अध्यक्ष पद भुषविले आहे. ते विदर्भ साहित्य संघाच्या अमरावती शाखेचे अध्यक्ष आहेत. त्याच प्रमाणे विदर्भाची कुलस्वामिनी श्री अंबादेवी संस्थानचे कोषाध्यक्ष, सातुर्णा औद्योगिक वसाहत सहकारी संस्थेचे संचालक, शासकीय आयटीआय (मुलींच्या) मध्ये संचालक, जोग चॅरिटेबल ट्रस्टचे सचिव असून त्यांनी भारत सरकारच्या माहिती व जनसंपर्क मंत्रालयाच्या डिएव्हीपी (केंद्र सरकारची जाहीरात वितरण करणारी संस्था) चे सदस्य म्हणून सुद्धा त्यांनी काम केले आहे. विलास अरूण मराठे दै. हिदुस्थानचे संस्थापक थोर स्वातंत्र्य सेनानी पत्रमहर्षी स्व. बाळासाहेब मराठे यांचे नातू व दै. हिदुस्थानचे दिवंगत मुख्य संपादक डॉ. अरूण मराठे व दिवंगत श्रीमती प्रभा अ. मराठे यांचे चिरंजीव आहेत. विलास अरूण मराठे यांच्या निवडीबद्दल पश्चिम विदर्भातील पत्रकार सृष्टीमध्ये आनंद व्यक्त करण्यात येत असून त्यांचेवर समाजातील सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.दैनिक विदर्भ प्रजासत्ताक कडून विलास दादा मराठे यांचे खूप खूप अभिनंदन!

# दुप्पट नोंदणीचे लक्ष्य गाठा - प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाणांची कार्यकर्त्यांना साद

## पदवीधर पदाधिकारी मेळाव्यात कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड उत्साह

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती**




गेल्या निवडणुकीत कोण उभे राहावे आणि कोणी माधार घ्यावी, हे ठरले नव्हते. प्रत्येक निवडणुकी कार्यकत्यांच्या मेहनतीवर लढवली जाते. गतवर्षी सुद्धा कार्यकत्यांनी अतोनात मेहनत घेतली, त्या मेहनतीचे चीज ही झाले फक्त उमेदवार निवडून आला नाही, बाची मात्र गेल्या निवडणुकीत झालेली चुकी करायची नाही. देवेंद्र फडणवीस यांनी घोषित केलेल्या उमेदवारालाच विजयी करण्याचा संकल्प करायचा आहे. ज्या उमेदवाराला आपल्यापेक्षा सर्वाधिक मते मिळाली, त्याच्यापेक्षा दुप्पट मतदारांची नोदणी या निवडणुकीमध्ये करण्याचा संकल्प करा, असा कानमंत्र भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी कार्यकत्यांना दिला.

पी आर पोटे पाटील महाविद्यालयाच्या स्वामी विवेकानंद सभागृहात आयोजित पदवीधर पदाधिकारी मेळाव्याला ते मार्गदर्शन करत होते. मंचावर पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे मंत्री डॉ. अॅड.

सरचिटणीस उपेंद्र कोठेकर, संजय कुटे, आमदार रणधीर आकाश फुडकर, खासदार डॉ. अनिल बोंडे, सावरकर, भाजपा आमदार प्रताप अडसड, प्रवीण तायडे, उमेश यावलकर , भाजप जिल्हाध्यक्ष रविराज देशमुख शहराध्यक्ष नितीन धांडे, आमदार प्रवीण पोटे प्रभुदास भिलावेकर, जयंत डेहनकर, दिनेश सूर्यवंशी निवेदिता चौधरी, शिवराय कुलकर्णी, संगीता शिंदे चंद्रशेखर भोयर राधा कुरील व अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

रवींद्र चव्हाण यांनी कोकण निवडणुकीचे उदाहरण दिले आणि काम कसे करायचे यासंदर्भात टिप्स दिल्या. त्यांनी सांगितले की, कार्यकर्त्यांचा उत्साह हा कायम असला पाहिजे. कार्यकर्त्यांमध्ये उत्साह असेल तरच आपण निवडणुकीत टिकू शकतो. त्यामुळे संघटनेचे काम करताना पूर्ण ताकदीने उतरा, विचार झालेला पूर्ण ताकदीने जनतेपर्यंत पोहोचवा. ३० ऑक्टोबरपासून सुरू होणाऱ्या नोंदणी प्रक्रियेकडे जास्तीत जास्त लक्ष दिले पाहिजे. माध्यमिक शाळा कनिष्ठ महाविद्यालयआणि महाविद्यालयांमधील शिक्षकांनी नोंदणी केली पाहिजे. प्रत्येक पक्ष कार्यकत्र्यान देखील या कामात सहभागी व्हायला पाहिजे. निवडणुकीत विजयी व्हायचं असेल तर अधिकचे गणित करता आले पाहिजे. यावेळी त्यांनी उदाहरण दिले की मंचावर असलेल्यांच्या काही संस्था आहेत, त्या संस्थेमध्येच कितीतरी नोंदणी होऊ शकते. त्यामुळे ती मते पक्की समजून त्या पद्धतीने अनेक मतदार नोंदणी करायला हवी. गेल्या निवडणुकीत विजयी उमेदवाराला १८,००० मते मिळाली होती, यावेळी आपल्याला ३५००० मते मिळायला हवी. त्यासाठी प्रयत्न केले पाहिजे. नवरात्रीचा संदर्भ देत त्यांनी प्रत्येकाने संकल्प करावा, असेही सांगितले. मतदार नोंदणी झाल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस जो उमेदवार निवडणूक रिंगणात उतरवतील त्याचे काम प्रत्येक कार्यकर्त्याला करावे लागेल, कारण अमरावती मतदारसंघातून आपल्या विचाराचा आमदार पाठवायचा आहे, हीच भेट द्या, असेही ते म्हणाले.

# बोगस घुसखोरी व आरक्षणाच्या प्रश्नावर तीव्र निषेध

## आदिवासी समाजाचे तिवसा तहसीलवर धरणे आंदोलन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७तिवसा**



एकीकडे धनगर बंजारा समाज तीव्र आंदोलन करत अनुसूचित जमातीमध्ये समावेशाची मागणी करत असताना आता आदिवासी समाजाने अनुसूचित जमातीच्या आरक्षणाला धक्का लावू नये, असे सरकारला सुनावले आहे. तिवसा तालुक्यातील क्रांतीसूर्य बिरसा मुंडा आदिवासी विकास बहुद्देशीय संस्था तिवसा यांच्या नेतृत्वाखाली तिवसातहसीलवर एकदिवसीय धरणे आंदोलन करण्यात आले आहे.

आदिवासी समाजाच्या नेत्यांनी धनगर आरक्षणावरून जागरूक होत आम्ही वाघाचे बछडे आहोत, आदिवासी समाजाच्या आरक्षणाला धक्का लागणार नाही व शासन निर्णय २५ फेब्रुवारी २०२२ मध्ये अनुसूचित जामातीच्या बिंदू २ वरून ८ वर आल्याने आदिवासीवर मोठ्याप्रमाणात अन्याय झाला असल्याने बिंदु नियमावलीमध्ये दुरूस्ती करून परत बिंदू क्रमांक २ आणण्यात यावे, असा निर्णय सरकारने घ्यावा, आंदोलनाची तीव्रता वाढवून आमचा न्याय हक्क प्राप्त करू, आमच्या हिताचे निर्णय झाले पाहिजे आम्ही वाघाचे बछडे आहोत, असा इशारा क्रांतीसूर्य बिरसा मुंडा आदिवासी विकास बहुद्देशीय संस्था तिवसा यांनी दिला. यावेळी तिवसातहसीलदार डॉ. मयूरकळसे यांच्यामार्फत मुख्यमंत्री यांना निवेदन देण्यात आले.राज्यातील धनगर व बंजारा समाजाला आदिवासीमधील आरक्षण मिळावे म्हणून जोरदार आंदोलन व दबाव आणला जात आहे; मात्र खरा आदिवासी समाज आजही वंचित असून, आमच्या ताटातील अगोदर आम्हाला वाढाः मात्र आमध्या ताटातील काढून दुसऱ्यांना देत असाल, तर मुळीच सहन करणार नाही, अन्यथा राज्य नव्हे देशभर आंदोलन होईल, याची सरकारने नोंद घ्यावी, असा इशारा दिला आहे.यावेळी क्रांतीसूर्य बिरसा मुंडा आदिवासी विकास बहुद्देशीय संस्था तिवसा बिरसा ब्रिगेडचे सर्व पदाधिकारी सुरेश उईके, अर्जुन युवनाते, यंच्छिन्द्र सयाम, मनिष धुर्वे, अरुण मडावी, सुरेश भलावी. सदाशिव उईके, महादेव धुर्वे, दिलीप सयाम, श्रीराम पंधरे, नरेश मडावी, मंगेश भोदळे, लक्ष्मण भलावी. यशवंत उईके, सुभाष धुर्वे, गजानन सिरसाम, कृष्णा कोकाटे, रामदास उईके यांच्यासह शेकडो आदिवासी बांधव उपस्थित होते.

# नवरात्र उत्सवात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिसांचा रुटमार्च व मॉक ड्रिल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७ दर्यापूर**

नवरात्र उत्सवाच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी अमरावती जिल्ह्याचे पोलिस अधीक्षक विशाल आनंद आणिअप्पर पोलिस अधीक्षक पंकज कुमावत यांच्या आदेशाने दर्यापूर शहरात भव्य रूटमार्च आयोजित करण्यात आला. या मोहिमेला उपविभागीय पोलिस अधिकारी सतीश कुलकर्णी व दर्यापूर पोलिसस्टेशनचे ठाणेदार सुनील वानखेडे यांचे मार्गदर्शन लाभले.

सदर रूटमार्च दर्यापूर पोलिसस्टेशन येथून सुरू होऊन बुटी चौक, कासतपुरा, कोल्हापुरी वेश, जिन्नतपुरा, नवीन नगरपालिका कार्यालय मार्ग, कन्या शाळा, छत्रपती शिवाजी महाराज चौक असा विविध भागातून काढण्यात आला. यारूटमार्चमध्ये शेकडो पोलिस कर्मचारी, होमगार्ड कर्मचारी, एसआरपीएफ जवान सहभागी झाले होते. नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण करण्याबरोबरच संभाव्य गोधळ टाळण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला.रूटमार्चनंतर कन्याशाळेच्या पटांगणावर पोलिस प्रशासनाकडून मॉक ड्रिलचे आयोजन करण्यात आले. या सरावात पीएजी गन, पंप अॅक्शन गन तसेच हँडग्रेनेडच्या वापराचा प्रत्यक्ष प्रात्यक्षिक सराव घेण्यात आला.अचानक उद्भवणाऱ्या आपत्कालीन परिस्थितीला तोड देण्यासाठी पोलिस दल सदैव सज्ज असल्याचा प्रत्यय नागरिकांना या मॉक ड्रिलमुळे आला. नवरात्र उत्सव काळात नागरिकांनी शांततेत सण साजरा करावा, तसेच प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन पोलिस प्रशासनाकडून करण्यात आले.

# बैरागड येथील वैद्यकीय अधिकारी सतत गैरहजर; महिन्याला वेतन मात्र नियमित

## खोट्या स्वाक्षऱ्या करून काढले जाते वेतन ग्रामस्थांमध्ये संतापाचा ज्वालामुखी

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२७अमरावती

धारणी तालुक्यातील बैरागड प्राथमिक आरोग्य केंद्र हे आरोग्यसेवेसाठी स्थापन झालेले महत्त्वाचे केंद्र. मात्र, येथे नियुक्त असलेल्या महिला वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रज्ञा भगवान वाकोडे (भगत) आणि त्यांचे पती डॉ. धम्मदीप भगत या दोघांचा गंभीर निष्काळजीपणा धक्कादायक आहे.डॉ. प्रज्ञा वाकोडे या रुग्णांना सेवा न देता, महिने- महिने मुख्यालयी गैरहजर राहूनही यांचे वेतन नियमितपणे काढले जात असल्याचा गंभीर आरोप ग्रामस्थांनी केला आहे ग्रामस्थांनी दिलेल्या माहितीनुसार डॉ. प्रज्ञा वाकोडे सलग दोन-दोन महिने केंद्रावर अनुपस्थित राहतात. त्या फक्त शासकीय सुट्यांच्या दिवशी बैरागडला येतात आणि कर्तव्यावर आहे असा आभास निर्माण करतात. प्रत्यक्षात अमरावतीत वास्तव्यास राहून मुलीच्या शिक्षण व संगोपनाचे त्या कर्तव्य निभावतात. याच काळात, हजेरी रजिस्टरवर खोट्या स्वाक्षऱ्या करून वेतन काढले जाते, असा आरोप स्थानिकांनी केला आहे.गंमत म्हणजे, इतकी मोठी गैरहजेरी असूनही ना तालुका वैद्यकीय अधिकारी, ना जिल्हा आरोग्य




प्रशासन कारवाई करताना दिसत आहे. उलट या दोन्ही अधिकाऱ्यांचे दर महिन्याला पगार वेळेवर खात्यात जमा होतात हे विशेष! सामान्य कर्मचारी दोन दिवस गैरहजर राहिला तरी नोकरीवर गदा येते. मग बैरागड प्रकरणी अनेक महिने अनुपस्थित राहणाऱ्या या डॉक्टरांवर शासन मूक-बधीर का झाले आहे? त्यांना शासकीय सेवेत का सोसले जात आहे?हा प्रकार नवीन नाही तर गेल्या अनेक वर्षांपासून सुरू असल्याचे ग्रामस्थांनी स्पष्ट केले आहे. आरोग्य केंद्रात सेवा ठप्प, गावकऱ्यांची अडचण वाढलेली आणि अधिकारी मात्र निवांत! या गंभीर प्रकरणामुळे बैरागड आरोग्य केंद्रावर प्रचंड प्रश्नचिन्ह उभे राहिले असून शासनाच्या कारभाराविषयी ग्रामस्थांमध्ये संतापाचा ज्वालामुखी उसळला आहे.

**मातामृत्यू व बालमृत्यूला डॉ. वाकोडेच जबाबदार**

मागील पाच महिन्यात दहा बालमृत्यू व एक मातामृत्यू झाला. या आधी सुद्धा अनेक घटना उघडकीस आल्या. डॉ. प्रज्ञा वाकोडे या मुख्यालयी उपस्थित राहत नसल्यामुळे बालमृत्यू व मातामृत्यूचे प्रमाण वाढलेले आहे.प्रसूतीची सुविधा रुग्णालयात उपलब्ध असतांना त्यांना धारणी येथील उपजिल्हा रुग्णालयात रेफर करण्याचा प्रताप डॉ. वाकोडे व त्यांचे पती डॉ. भगत करतात त्यामुळे अनेकदा रस्त्यातच प्रसूती झाल्या आहेत. आजवर झालेल्या बालमृत्यू व मातामृत्यूला डॉ. वाकोडे जबाबदार असून त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करावा अशी मागणी गावकऱ्यांनी केली आहे.

# ३१४.८९ कोटींचा टेंडर मंजूर; शासकीय मेडिकल कॉलेजच्या इमारतीच्या कामाला गती

## आलियाबाद (वडद) येथे महाविद्यालय-रुग्णालयाची वास्तू उभी केली जाणार : प्रत्यक्ष बांधकामासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची नियुक्ती : दोन वर्षामध्ये बांधकाम पूर्ण करण्याची निविदेत मुदत

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२७ अमरावती

अमरावतीत १००प्रवेश क्षमतेचे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि त्याला संलग्न ४३० खाटांच्या रुग्णालयाच्या उभारणीसाठी कोंडेश्वर नजीक आलियाबाद (वडद) महाविद्यालय आणि रुग्णालयाची वास्तू उभी केली जाणार आहे. यासाठी वैद्यकीय शिक्षण व संशोधन विभागाने ३१४ कोटी ८९ लाख रुपयांची मर्यादित स्वरुपाची निविदा जाहीर केली आहे. नुकतीच ही निविदा प्रक्रिया पूर्ण झाली असून लवकरच संबंधित एजन्सीमार्फत आलियाबाद काम सुरु होईल. विशेष म्हणजे गेल्या वर्षी (वडय) येथील ११.२९ हेक्टर वास्तू उभारणीचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याहस्ते ऑनलाईन पद्धतीने करण्यात आले होते. त्यामुळे आता अमरावती वैद्यकीय शिक्षणाच्या परिघावर नवे केंद्र म्हणून उदयास येणार आहे.




दर्जेदार, गुणवत्तापूर्वक होण्यासाठी केंद्र शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांचे बांधकाम वैद्यकीय शासनाच्या सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमामार्फत कामे करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सद्यस्थितीत सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमामार्फत अमरावतीसह १० महाविद्यालयाची बांधकामटेंडर प्रक्रिया अंतिम टप्प्यात असून लवकरच बांधकामे सुरू करण्यात येणार आहेत. महाविद्यालयाच्या उभारणीत आर्किटेक रल बांधकाम (G+5), डॉस्पिटल बिल्डिग कन्सल्टन्सी सर्व्हिसेस आणि मेडिकल कॉलेजचे (G+6), डोन बंगला (G+1), मुलीचे वसतिगृह (G+4) मुलांचे वसतिगृह निवासी निवासस्थान प्रकार-II (G+4) - २ (G+4), परिचारिका वसतिगृह निवासी निवासस्थान प्रकार-III (G+3) - २ निवासी निवासस्थान प्रकार-खत (G+2) - २ , शवगृह (G+1) स्वयंपाकघर/कपडा धुण्याची व्यवस्था (G+5) अतिथी गृह (G+2) वॉल आणि गेट, सांडपाणी प्रक्रिया संयंत्र, सांडपाणी सुरक्षा केबिन, विविध बांधकामे जसे की कंपाऊंड वॉल आणि गेट,सांडपाणी प्रक्रिया सयंत्र, सबस्टेशन डीजी सेट, पाण्याचा मुख्य साठा (१००००० लिटर), भूमिगत पाण्याची टाकी, ट्रान्सफॉर्मर, यूपीएस, एमएसईडीसीएल पुरवठा शुल्क, अंतर्गत रस्ते जमीन विकास, पार्किंग, जमीन स्केपिंग, माती तपासणी, सीसी ड्रेनेज आणिसीडी कामे इत्यादींचा समावेश आहे. अंतर्गत आणि बाह्य विद्युतीकरण, अग्निशमन व्यवस्था प्रदान करणे. अमरावती येथे एबी रूम, एरिया लाइटिंग, पंप, जनरेटर, लिफ्ट (२०), एअर कंडिशनिग, सीसीटीव्ही, पाणीपुरवठा, स्वच्छताविषयक कामे आणि फर्निचर आदी कामांसाठी या निविदा काढण्यात आल्या आहेत.

इंजिनिअरिंग, खरेदी आणि बांधकाम ईपीसी कराराच्या अंतर्गत केले जाणार आहे. काम पूर्ण झाल्यानंतर ६० महिन्यांपर्यंत इमारत देखरेख , तांत्रिक सहाय्य करण्याची जबाबदारी राहणार आहे.या शिवाय इमारतीसाठी क्त-उ, प्लंबिंग, लिफ्ट, आयटी नेटवर्किंग आणि सिस्टम लेआउट, पाणीपुरवठा, इमारतीमधील विद्युत आणि पार्किंग व्यवस्था, अग्निशमन शोध आणि संरक्षण प्रणाली, सांडपाणी आणि ताजे आणि शुद्ध पाणी व्यवस्था, भूमिगत गटर, लॅन, सीसीटीव्ही आणि प्रवेश नियंत्रण प्रणाली, इमारत व्यवस्थापन प्रणाली, पीए प्रणाली, बाह्यविद्युतीकरण, पॅनेल, डीजीसेट, सौर ऊर्जा प्रणाली, पावसाचे पाणी साठवण, सांडपाणी प्रक्रिया संयंत्र आणि प्लॅटिनम रेटेड ग्रीन बिल्डिगसाठी आवश्यक असलेले संबंधित डिझाइन, आयजीबीसी प्रमाणपत्र इत्यादी तसेच लँडस्केपिग, रस्त्याचे काम, फलोत्पादन इत्यादी इमारतीसाठी आवश्यक असलेल्या सर्व सेवा. सरकारच्या मानक मानकांनुसार इमारत भूकंपाचा प्रतिकार करण्यासाठी डिझाइन केली जाणार आहे. संकल्पनात्मक योजना/ डिझाइनवरील आर्किटेक्चरल तपशील, माती तपासणी आणि स्थलाकृतिक सर्वेक्षण, संरचनेची रचना आणि टएढ सेवांसह संबंधित कामांचे, खखढ कडून स्ट्रक्चरल डिझाइनची प्रूफ चेकिंग, प्लॅटिनम रेटेड ग्रीन बिल्डिंग, खत्रइ उ प्रमाणपत्र प्राप्त करणे, स्थानिक प्राधिकरणांकडून बांधकामपूर्व आणि बांधकामानंतरच्या सर्व वैधानिक मंजुरी प्राप्त करणे ज्यात इमारत योजना मंजुरी समाविष्ट आहे; पर्यावरणीय मंजुरी; वृक्षतोडीची परवानगी, पाणीपुरवठा, ड्रेनेज, वीज पुरवठा इत्यादी सेवा कनेक्शन; स्थापनेसाठी संमती, आदी सर्व कामांचा उल्लेख या निविदेत करण्यात आला आहे. गुरुवारला निविदाची शेवटची तारीख होती. त्यानंतरटेंडर प्रक्रियापूर्णहोताच, प्रत्यक्ष कामाला सुरुवातहोण्याची शक्यता आहे. प्रक्रिया पूर्ण होण्यापासून २४ महिन्यांच्या आत संबंधित कंत्राटदारांना हे काम पूर्ण करण्याची मुदत देण्यात आली आहे. मेडीकल कॉलेज, हॉस्पीटल, होस्टेल, क्वॉर्टर्स, गेस्ट हाऊस, मर्क्युरीसह एकूण प्लिंथ एरीया ९४१२५.३७ चौ. मीटर एवढा राहणार आहे.

# आरएसएसच्या विजयादशमी सोहळ्याला सीजेआय भूषण गवईच्या आई मुख्य अतिथी

## निमंत्रण पत्रिका येताचा सर्वत्र चर्चेचा विषय : ५ ऑक्टोबरला अमरावतीत विजयादशमी सोहळा

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२७ अमरावती

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या ऐतिहासिक अशा विजयादशमी उत्सवाची जय्यत तयारी सुरू आहे. नागपूरमध्ये २ ऑक्टोबरला संघाच्या विजयादशमी सोहळा साजरा होणार आहे. या कार्यक्रमाला माजी राष्ट्रपती रामनाथ कोविद यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. तर ५ ऑक्टोबरला अमरावती येथे विजयादशमी सोहळा साजरा होणार असून या कार्यक्रमाला सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या आई कमलताई गवई मुख्य अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. माजी राज्यपाल दिवंगत रा. सू. गवई हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती दीक्षाभूमीचे अध्यक्ष होते. दीक्षाभूमीच्या




उभारणीत त्यांचा मोलाचा वाटा होता. सध्या त्यांचे चिरंजीव राजेंद्र गवई हे स्मारक समितीचे सदस्य आहेत. या परिवारातील कमलताई गवई संघाच्या शताब्दी सोहळ्याला उपस्थित राहणार असल्याने सर्वत्र चर्चेचा विषय झालेला आहे.

नागपूरमध्ये होणाऱ्या यावर्षीच्या सोहळ्याला संघ परिवारातील विविध संस्थांच्या प्रमुखांसह तब्बल पंधरा हजारांवर गणवेशधारी स्वयंसेवक उपस्थित राहणार आहेत. याशिवाय संघाने विविध देशांच्या आंतरराष्ट्रीय दुतावासांनाही कार्यक्रमाचे निमंत्रण दिले आहे. त्यामुळे यावर्षी विदेशी पाहुणे, चित्रपट अभिनेते, उद्योजक अशा विविध क्षेत्रातील लोक उपस्थित राहणार आहे.

**कमलताई गवईच्या उपस्थितीची चर्चा का ?**

विजयादशमीच्याच दिवशी १९२५ मध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना झाली होती. यंदा देशभरात पथसंचलनाचे आयोजन संघाच्या स्थापनेला १०० वर्षे पूर्ण होत असल्याने संघाचा शताब्दी वर्षातील हा ऐतिहासिक विजयादशमी सोहळा राहणार आहे. तर दुसरीकडे दीक्षाभूमी हे नागपूरचे वैशिष्ट्य आहे. १४ ऑक्टोबर १९५६ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी याच दीक्षाभूमीच्या ठिकाणावरून बौद्ध धम्माची दीक्षा घेतली होती.हा विजयादशमीचा दिवस होता. त्यामुळे नागपूरमध्ये विजयादशमीच्या दिवशी दीक्षाभूमी आणि संघभूमी अशा दोन ठिकाणी प्रमुख कार्यक्रम असतात. यंदा संघाच्या शताब्दी वर्षाचा सोहळा अमरावती येथे पाच ऑक्टोबरला साजरा होणार असून दीक्षाभूमी उभारणीत प्रमुख वाटा असणाऱ्या परिवारातील कमलताई गवई या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार असल्याने सर्वत्र चर्चेचा विषय झालेला आहे.

**देशभरात असणार पथसंचलाचे आयोजन**

शताब्दी वर्ष सोहळ्याला उपस्थित राहण्यासाठी अनेक स्वयंसेवक इच्छुक आहेत. मात्र, मैदानाची मर्यादा पाहता सर्वांना प्रवेश मिळणे अशक्य आहे. त्यामुळे यावर्षी नागपूरसह देशभरात संघाच्या शाखा असणाऱ्या विविध भागांमध्येही शताब्दी सोहळा साजरा होणार आहे. तसेच, नागपूरसह विविध शहरांमध्ये पथसंचलनाची तयारी सुरू असून प्रत्येकाने आपल्या भागात पथसंचलन करून शताब्दी सोहळा साजरा करावा, अशा सूचना देण्यात आल्याची माहिती आहे.

# रस्ता आणि एसटी बस सेवा सुरू करा

## जळका शहापूरमध्ये विद्यार्थ्यांचे आक्रमक आंदोलन



विदर्भ प्रजासत्ताक
दि.२७जळका शहापूर

शिरजगाव मोझरी मार्गावरील जळका शहापूर गावातील रस्त्याची अत्यंत खराब अवस्था आणि गेल्या १०-११ महिन्यांपासून बंद असलेली एसटी बस सेवा यामुळे त्रस्त झालेल्या गावकरी आणि विद्यार्थ्यांनी आज दिनांक २७ सप्टेंबर २०२५ रोजी आक्रमक आंदोलनाला सुरुवात केली आहे.

या आंदोलनात शेकडो विद्यार्थी आणि ग्रामस्थ रस्त्यावर उतरले असून, त्यांनी स्थानिक स्टोन क्रेशरच्या ओव्हरलोड ट्रक वाहतुकीला थांबवले आहे. आंदोलन करणाऱ्यांचे म्हणणे आहे की, या अवजड ट्रकांमुळे रस्त्याची अवस्था दयनीय झाली असून, याचाच त्रास ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आणि ज्येष्ठ नागरिकांना सहन करावा लागत आहे.गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या या प्रश्नांबाबत प्रशासनाने गंभीर दखल घ्यावी, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशारा ग्रामस्थ व विद्यार्थ्यांनी दिला.

विद्यार्थ्यांची दैनंदिन हलाखीची स्थिती :सध्या शाळेतील विद्यार्थ्यांना दररोज किमान ३-३.५ किलोमीटर पायपीट करून सावर्डे येथे जावे लागते, कारण तिथूनच बस सेवा उपलब्ध आहे. विशेष म्हणजे, १०वी ते १२वीच्या विद्यार्थिनींना रात्री ९-९.३० वाजता सावर्डेहून परतताना अंधारात चालत गावात यावे लागते, जे त्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून अत्यंत धोकादायक आहे.

या आंदोलनात श्रवण भगत, अनिकेत पन्नासे, तुषार वानखडे, तेजस वानखडे, प्रतीक इंगळे, मयूर भगत, महेश ठाकरे, ओजस पवार, ओम पवार आदी विद्यार्थ्यांनी पुढाकार घेत हा लढा शांततामय पण ठाम पद्धतीने लढा उभारला आहे.या आंदोलनाची नांदगाव पोलीस ठाण्याच्या कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहून शांततेत पार पडण्याची दक्षता घेतली आहे.

**ही आहे ग्रामस्थांची ठाम मागणी :**

जळका शहापूर ते शिरजगाव मोझरी मार्गावरील रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्यात यावी, बंद असलेली एसटी बस सेवा त्वरित सुरू करण्यात यावी, ओव्हरलोड ट्रक वाहतुकीवर नियंत्रण आणाव.

# अमरावती, यवतमाळ एमआयडीसीत उद्योग न उभारणाऱ्या ३५० जणांना नोटीस

## अमरावती २२६ ,यवतमाळ जिल्ह्यात १४९ उद्योग बंद..उद्योग चालू न केल्यास भूखंड घेणार शासन परत

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२७ अमरावती

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ अर्थात एमआयडीसी कडून उद्योग लावण्यासाठी जमीन उपलब्ध करून देण्यात आली, मात्र अमरावती जिल्ह्यात २०० आणि यवतमाळ जिल्ह्यात १५०



लोकांनी अद्याप उद्योग उभारले नाहीत, त्यामुळे ३५० जणांना नोटीस देण्यात आली आहे, अमरावती जिल्ह्यातील एमआयडीसीत ११४१ उद्योगासाठी जमीन दिली गेली होती, त्यापैकी ७१५ उद्योग येथे चालू आहेत, तर २२६ उद्योग बंद झाले आहेत, आणि २००भूखंडावर उद्योग सुरू केले नाही, यवतमाळ जिल्ह्यात ५४७ उद्योग सुरू आहेत आणि १५० उद्योग बंद झाले आहेत, त्यामुळे ज्यांनी भूखंड घेतले त्यांनी जर उद्योग सुरू केले नाही तर त्यांची भूखंड परत घेतल्या जाईल असा इशारा शासनाने दिला आहे.

# रा. स्व. संघाचा बाल व शिशु स्वयंसेवकांचा विविध नगरांचे विजयादशमी उत्सव व शस्त्रपूजन रविवारी

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२७अमरावती

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त अमरावती महानगराच्या आठ नगरातील बाल व शिशु स्वयंसेवकांचा विजयादशमी उत्सव व शस्त्रपूजनाचा सोहळा दोन-दोन नगर मिळून एकाच दिवशी, एकाच वेळी चार स्थानांवर रविवार, दि. २८ सप्टेंबर रोजी सायंकाळी ५.३० वाजता आयोजित करण्यात आलेला आहे.

बडनेरा व इंद्रायणी नगरगणेश नगर मैदान, माजी उपमहापौर डॉ. तायडे यांच्या घराजवळ होणाऱ्या या सोहळ्यात प्रमुख अतिथी म्हणून टॉप ३० सायन्स अॅकेडमीचे संचालक प्रा. विक्रम तळोकार तर प्रमुख वक्ते म्हणून धामणगाव रेल्वे तालुका कार्यवाह विशालजी मोकाशे




मार्गदर्शन करणार आहेत.

छत्रपती शिवाजी महाराज नगर व संत गाडगेबाबा नगरश्री बालवीर हनुमान मैदान, पोलीस कॉलनी येथे होणाऱ्या या उत्सवात प्रमुख अतिथी म्हणून कन्सल्टिंग फिजिशियन डॉ. स्वप्नील पाटील तर प्रमुख वक्ते म्हणून जिल्हा शारीरिक शिक्षण प्रमुख ऋषिकेशजी ठाकरे सहभागी होणार आहेत.

अंबिका नगर व तपोवन नगरडॉ. नरेन्द्र भिवापुरकर अंध विद्यालय, चांदुर रेल्वे रोड येथे होणाऱ्या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून *शिखर एज्युकेशन प्रा. ली. चे संचालक विक्रम रविजी खेतान* तर प्रमुख वक्ते म्हणून जिल्हा सेवा प्रमुख अजयजी काळे मार्गदर्शन करणार आहेत.

बालाजी नगर व सोमेश्वर नगरशांती निकेतन शाळा, ड्रीम्स पार्क समोर, न्यू गणेश कॉलनी येथे होणाऱ्या सोहळ्यात प्रमुख अतिथी म्हणून प्रा. सुरजजी हेरे तर प्रमुख वक्ते म्हणून जिल्हा बालकार्य प्रमुख अनिकेतजी कराळे उपस्थित राहतील.

विजयादशमी उत्सवाच्या निमित्ताने स्वयंसेवकांच्या कवायती, शारीरिक प्रात्यक्षिके व गीतांनी वातावरण भारून जाणार असून संघशिस्तीचे दर्शन नागरिकांना घडणार आहे. स्थानिक नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रम यशस्वी करावा, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

# लंडनमध्ये जागतिक कराटे स्पर्धेत अमरावतीचा लौकिक



## दिया व रियांश यांची चमकदार कामगिरी

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२७अमरावती

अमरावती जिल्ह्याचा लौकिक वाढविणारी आनंदाची बातमी लंडनहून आली आहे. अमरावतीचे रहिवासी सुरज नारायणराव गुल्हाने यांचे चिरंजीव दिया व रियांश यांनी गत शनिवार व रविवार रोजी इंग्लंडच्या क्रॉली येथील घर स्टेडियममध्ये आयोजित ३ रे वर्ल्ड कराटे चॅम्पियनशिप मध्ये सहभाग घेऊन उल्लेखनीय यश संपादन केले.

रियांश याने कराटे, बॉक्सिंग, पंचिंग व बलून बॉक्सिंग या विविध प्रकारांमध्ये १ सुवर्ण, १ रौप्य व १ कांस्य पदक पटकावले. तर दिया हिने १३-१४ वयोगटातल्या खेळाडूं विरुद्ध धैर्याने स्पर्धा करत १ रौप्य व १ कांस्य पदक मिळवले.याचबरोबर पालक व बालक काता स्पर्धेत प्राची सुरज गुल्हाने, दिया व रियांश या तिघांनी एकत्रितपणे कांस्य पदक पटकावून परिवारालाही अभिमानाचा क्षण दिला.विशेष म्हणजे, या भव्य स्पर्धेच्या उद्घाटन सोहळ्यात दिया व रियांश यांनी भारताचा तिरंगा अभिमानाने फडकवत ३० देशांतील १२०० स्पर्धकांमध्ये भारतीय प्रतिनिधी म्हणून सहभाग नोंदवला.गुल्हाने कुटुंब लंडनमध्ये स्थायिक असूनही मुलांना भारताबद्दल असलेला आपुलकीचा व अभिमानाचा भाव कौतुकास्पद आहे. दिया व रियांश यांनी मिळवलेले यश केवळ आमच्या कुटुंबासाठी नव्हे, तर संपूर्ण अमरावतीसाठी अभिमानाची बाब आहे, असे पंकज गुल्हाने यांनी सांगितले.

# नवरात्रीचे नवरंग...............

## नवरात्रीचा आजचा साहवा दिवस; आजचा रंग राखडी



**साधेपणात सौंदर्य आणि शालीनतेत सामर्थ्य, राखाडी रंगाच्या साड्यांमध्ये महिला महाविद्यालयातील प्राध्यापिका...**

# स्वच्छ वायू सर्वेक्षणात अमरावती देशात प्रथम

## आयुक्त सौ. सौम्या शर्मा चांडक यांचा राष्ट्रीय स्तरावर गौरव, पालकमंत्र्यांच्या हस्ते सत्कार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७अमरावती**

स्वच्छता, पर्यावरण संवर्धन आणि शाश्वत नागरी व्यवस्थापनाच्या क्षेत्रात अमरावती महानगरपालिकेने एक ऐतिहासिक कामगिरी केली आहे. केंद्र सरकारच्या स्वच्छ वायू सर्वेक्षण २०२५ या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत अमरावतीने देशात प्रथम क्रमांक पटकावला असून, यामुळे शहराच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.



या अभूतपूर्व यशाबद्दल महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक सौ. सौम्या शर्मा चांडक यांना केंद्रीय ग्रामविकास मंत्री मा. भूपेंद्रजी यादव यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र, सन्मानचिन्ह आणि ७५ लाखांचे पारितोषिक नवी दिल्ली येथे प्रदान करण्यात आले.सौ.चांडक यांनी आयुक्त पदाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर स्वच्छता, पारदर्शक प्रशासन, हरित उपक्रम आणि नागरी सुविधा यावर विशेष लक्ष केंद्रित करून सकाळी ६ वाजल्यापासून स्वतः रस्त्यावर उतरून अभियानास दिशा दिली. त्यांच्या नेतृत्वाखाली मनपामध्ये भ्रष्टाचाराला आळा बसला, नागरी सेवा जलद आणि सुटसुटीत झाल्या, यामुळे संपूर्ण शहरात सकारात्मक परिवर्तन घडले.या यशाचा गौरव करण्यासाठी अमरावती महानगरपालिकेच्या अधिकृत सभेत आमदार रवी राणा यांनी अभिनंदन प्रस्ताव मांडला, जो एकमताने मंजूर करण्यात आला. त्यानंतर पालकमंत्री ना. चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते सौ. चांडक यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.या प्रसंगी राज्यसभा सदस्य डॉ. अनिल बोंडे, आमदार संजय खोडके, सुलभा खोडके, राजेश वानखडे, प्रवीण तायडे, जिल्हाधिकारी डॉ. आशिष येरेकर, भाजप शहराध्यक्ष डॉ. नितीन धांडे, तसेच विविध पक्षांचे पदाधिकारी, माजी नगरसेवक व मनपा अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.